साप्ताहिक

# माणूस

शनिवार
८ ऑगस्ट १९८१
एक रुपया



यांच्यासाठी आपण काही करू
शकतो का ?
यांच्या दुःख-दैन्यावर
आपली प्रतिक्रिया काय असावी ?
दया आणि कळवळा ?
सिंपथी किंवा एंपथी ?
ओशाळेपणा की
तत्त्वज्ञानी स्थिरचित्त
शांतता ?
भडकती चीड आणि
तिरस्कार ?
यांपैकी नेमक्या कशाने यांचे
प्रश्न सुटतील ?
उद्योगधंद्यांचं विकेंद्रीकरण होणार
कसं ?
साधा कांदे–बटाटे बाजारसुद्धा
अजून मुंबईबाहेर हालत नाही तिथे
खेड्या-पाड्यात कुठले उद्योग पोचणार ? पण मग हा प्रश्न तरी कसा सुटणार ? कसा सुटणार ??..... →

मुंबई वार्ता

# मी फक्त आवंढा गिळला....

शरद जोशी म्हणतात, भारतात दोन देश आहेत. एक इंडिया आणि दुसरा भारत. तशा मुंबईतसुद्धा तीन मुंबया आहेत. एक 'बॉम्बे', दुसरी मध्यमवर्गीय 'मुंबई' आणि तिसरी देशभरातून मोठ्या आशेनं धाव घेणाऱ्यांची 'म्हमई' किंवा 'बंबई'! या तीन मुंबया गुण्यागोविंदाने नांदण्याचे प्रसंग फार कमी आणि झोपडी हटाव मोहिमेनं तर 'बॉम्बे' आणि 'मुंबई'ची म्हमईवर कुरघोडीच झाली!

रोज लोकलनं जाता-येता विद्याविहारच्या नाथानी स्टील इंडस्ट्रीजच्या फलकावरचा रोज बदलता सुविचार मुंबईकर वाचतो. एअर इंडियाच्या दर आठ-पंधरा दिवसाला बदलणाऱ्या आकर्षक जाहिराती पहातो, तसा हुरुन अल रशीद जनाब अंतुल्यांच्या नित्य नव्या घोषणाही ऐकतो. पदपथावरच्या 'झोपडी हटाव' धडकमोहिमेचंही असंच झालं. पोलिसयंत्रणेच्या अपुरेपणामुळे किंवा भ्रष्टपणामुळे, परिस्थितीच्या दडपणामुळे, जीव मुठीत धरून झोपड्या कशा परत उभ्या राहतात हा तर नेहमीचाच अनुभव.

बुधवार पहाट, धो धो पाऊस, मर्क्युरी लॅम्पचा निटसता प्रकाश, पोलिसांच्या जीप्स, गाड्या, बसेस रोरावत येऊन मुंबईतल्या निरनिराळ्या झोपडपट्ट्यांपुढे उभ्या राहिल्या आणि पदपथावरच्या रहिवाशांना आपल्या साखरझोपेतून खडबडून जाग आली; पण झोपडपट्टीत साखरझोप लागत असेल का? शिवाय त्या रात्री पावसाच्या अस्मानी आपत्तीनं एवढा हैदोस घातला होता की, आपापल्या फाटक्या, गळत्या आभाळाला ठिगळं लावीत त्यांच्यातले बहुसंख्य उद्याच्या उषःकालाची वाट बघत जागेच असतील! काय होतंय ते नीट कळण्याची वाट न बघता हाती लागतील त्या चीजवस्तू घेऊन त्यांनी पोबारा केला. बघता बघता जीर्णशीर्ण झोपड्या भुईसपाट झाल्या! इथे फूटपाथही आहे, हे परत एकदा लक्षात आलं आणि झोपडपट्टीलाच काय, पण तमाम मुंबईलाच खडबडून जाग आली. वार्ताहरांना, छायाचित्रकारांना भरपूर काम मिळालं. दुसऱ्या दिवशीच्या सगळ्याच वर्तमानपत्रातून 'स्पेशल, खळबळजनक रिपोर्टस्' आले आणि त्याबरोबर, ऑफिसला जाताना आणि लंच टाइममध्ये चर्चा करायला एक चविष्ट विषय मिळाला.

बेघर झालेली ही माणसं आता असतात कुठे, आणि करतात काय, असा विचार करत मी पश्चिम रेल्वे माटुंग्याला गेले. रेल्वेमार्गाला समांतर अशा भल्यामोठ्या झोपडी-वसाहतीचं आता तिथून उच्चाटन झालेलं होतं आणि मी हा मजकूर लिहिते आहे तोपर्यन्त म्हणजे ३१ जुलैपर्यन्त तरी तिथे नव्यानं झोपड्या उभारलेल्या नव्हत्या. समोरचा फूटपाथ अगदी रिकामा. कुठे जमिनीत खाब रोवल्याच्या खुणा, कुठे दगड-विटांच्या अजूनही शिल्लक असलेल्या उपाशी चुली, तर कुठे त्याच्या फक्त काळवंडलेल्या खुणा! काही कचरा, काही कागद, काही चिंध्या, एखाद-दुसरा बांबू, नाही तर कामट्या, बाकी सगळं ओसाड! म्हटलं, गेली कुठं ही माणसं? सदतीस बसेसमधून सगळीच्या सगळी मुंबईबाहेर गेली की काय? की मालवणीच्या आपल्या 'प्रॉमिस्ड लॅंड'वर गेली?

स्टेशनवर सहज केवळ एका वाक्यानं चौकशी केली आणि जवळच उभा असणारा एक फाटका, काळा तरुण माझ्यामागं पळत आला. कुजबुजत्या आवाजातले शब्द—अपना झोपडी गिराया उसके लिए कोई आया है। आणि बघता बघता माझ्याभोवती हा मोठा घोळका जमला. माणसं जमली ती अक्षरशः 'फ्रॉम नो व्हेअर!' आजूबाजूच्या मध्यमवर्गीय घरातली माणसंसुद्धा 'काय तमाशा चालू आहे' म्हणून गॅलरीतून डोकवून गेली. एका सरदारजी टॅक्सी-ड्रायव्हरनं टॅक्सी थांबवून, 'अच्छे घर की दिखाई देती हो बाई, काय को इन लोग के लफडे में पडती है?' असा इशारावजा सल्ला दिला.

जमलेल्यांपैकी प्रत्येकालाच बोलायची घाई झालेली. हा चिरंजीव—हो हो. चक्क नावच चिरंजीव. धंदा—शोभेचे मणी विका-


साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : दहावा

८ ऑगस्ट १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

साप्ताहिक माणूस.
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

यचे. रंगीबेरंगी पोती विकायच्या. चाललंय कसं तरी. पोट भरतोय. स्वतःचं, बायको आणि पाच मुलांचं. वय ? असेल बावीस-तेवीस. आज पोत तुटली, मणी विस्कटले. बायको आणि पोरं उपाशी, आजारी, रस्त्यावर आलेत. गावी परत जाणार ? कुठलं गाव ? अकोल्याजवळ कुठे तरी छोटं शेत होतं म्हणतात ते हिसकावलं सावकारानं. आई-बाप मेले. वयाच्या पाचव्या वर्षी मुबईत आलो. गाव आठवतही नाही. गावी ना घर ना शेती. आता गाव कुठलं ? मुबई हेच गाव !

लछमीबेन. वय साधारण पन्नाशीच्या पुढे. अंगकाठी मजबूत. कमरेवर हात ठेवून ठसक्यात बोलणं. आमचं गाव पार लांबचं. तिकडे गुजराथमध्ये; पण तिथे काही नाही आता ! सगेवाले नाहीत की कोण नाही. दारोदार हिंडते, जुने कपडे घेते, शिवून नीटनीटके करून विकते. बरं चाललं होतं सगळं. तो पलीकडचा म्हातारा ? नवरा माझा. इथल्या हवेनं आणि दमट ओलसर जमिनीनं दमेकरी झालाय पण पोरं आहेत. दोघं आहेत उनाड आणि गुड; पण बाकीची करतात मदत. मी, माझा म्हातारा आणि ही आठ पोट्टी. कुणी उपाशी रहात नाही. सगळ्या पोरांचा जन्म इथलाच. हे सांगताना अभिमानाचा सूर.

'म्हणे मुबई हेच आमचं गाव !' एक 'मुंबई'कर तळतळून म्हणाला. 'पाडल्या त्या झोपड्या ते फार बरं केलं. या साल्याना काही सेन्स ऑफ डिसेन्सी आहे का ? रस्त्यानं फिरायची लाज वाटावी आणि किळस यावी अशी घाण करून ठेवतात रस्त्यावर.'

'माय. दीज स्लम्स आर हॉरिबल. यू नो, इन सिंगपोर, देअर आर अॅब्जोल्यूटली नो स्लम्स व्हेन आय वॉज इन स्टेटस् !' बॉम्बेवाला.

मुबई कुणाची ? पोटात ओल धरून असणारा तान्सा तलाव तर सगळ्यांनाच 'जीवन' देतो. काही जणाच्याकडे सुबक स्टीलच्या दिमाखदार टॅप्समधून तो येतो. काहीना फुटक्या, गळक्या, पाइपमधून किंवा पाइप फोडून त्याच्यापर्यंत पोचावं लागतं, एवढाच फरक.

म्हाद्या पुष्कळ वेळ हात जोडून लक्ष वेधून घ्यायचा प्रयत्न करतोय. कशाला रे आलास मुबईत ? वाशीमजवळचा फासेपारधी. उदरभरणासाठी आज इथे तर उद्या तिथे, अशी भटकंती, घर-दार, शेती-वाडीचा प्रश्नच आलेला नाही. अंगी काही कसब नाही. पिढीजात चालत आलेला प्राणी पकडायचा पिंजरा हे भांडवल ! 'वन्य प्राणी वाचवा' किंवा तत्सम काही तरी मोहिमेत पिंजरा जप्त झाला. तेव्हा आता गाव मुबईच ! या याच गटारगंगेच्या काठी सहाच्या सहा पोरं वाढली. हा, आता दोन दगावली; पण चार आहेत अजून जित्ती.

'आम्ही मध्यमवर्गीय परवडत असूनसुद्धा कटाक्षानं दोनच मुलं होऊ देतो. आणि ही अडाणी प्रजा चाललीच आहे वाढत. आसाममधल्या घुसखोरानी आसाम बळकावला. हे उपरे मुबई पारखी करणार आम्हाला ! कुठून पोसणार या साऱ्यांना ? मग ती होतात उनाड आणि गुड. कामधदा काही सगळ्यानाच मिळत नाही. मग रस्त्यावरच्या बायकामुलींची छेड काढ, रेल्वेतले दिवे चोर, पाकीट मार, भुरट्या चोऱ्या कर. परवा शिवडीला धावत्या गाडीत चढलेलं गुंडांचं टोळकं. आणखी काही दिवसांपूर्वी दिवसाढवळ्या सकाळी दहा वाजता एका बाईवर बलात्काराचा, तोही असाच गर्दीच्या गाडीत प्रयत्न झाला; या सगळ्या घृणास्पद प्रकारांचं आगर म्हणजे झोपडपट्टी ! त्याची ती घाण म्हणजे रोगराईचा उगम. ही माणसं स्वत ही खड्डयात जातील आणि शहरही खड्डयात घालतील– हा, आता भर पावसात झोपड्या पाडायची काही आवश्यकता नव्हती.' 'बरोबर !' मुबई आणि बॉम्बेवाल्यांनी सात्त्विकपणे माना डोलवल्या. 'नाही तरी रहातात आहेतच इतकी वर्षं, आणखी चार महिने राहिले असते तरी फार बिघडलं नसत !'

पावसातच पाडल्या तुमच्या झोपड्या अगदी ?–अहो बाई, नाही तरी पावसात काय, झोपडी असणं–नसणं सगळं सारखंच ! डोक्यावरचा आसरा नाममात्र. झोपड्यांच्या भिंती ताडपत्री, गोणपाट, प्लास्टिकचा कागद नाही तर वर्तमानपत्र-झावळ्यांच्या! मुबईच्या तुफानी पावसात लक्तर होतात त्याची. हे एवढं पाणी तुबतं आत. दरिद्री मिळकतीतल्या इन मीन चीजवस्तू तरंगत रहातात पाण्यावर. पाणी साठलेलं नसलं तरी ओल असतेच जमिनीला. कसला निवारा आणि कसलं काय ? उरलं–सुरलं छप्पर पावसानं पाडायचं ते यंदा पोलिसानी उडवलं !

हम गरीब लोग का जनमही ऐसा दुःख सहने का है– काठीच्या आधारानं उभी राहिलेली आणि दुःखावेगानं कोसळू पहाणारी एक म्हातारी म्हणत होती. झोपडी पाडली ती पाडलीच; पण त्याबरोबर पोलिसानी मारहाण केली. फुटका–तुटका संसार विखुरला. थोडं–फार धंद्याचं सामान होतं तेही हाती लागलं नाही. रोज नेसायचं धडुतसुद्धा गायब झालं ! माणसानं जगावं कसं ?

का आलात तुम्ही आजीबाई मुबईत ?


का येतात ही माणसं मुबईत ? आपली गावं सोडून फुटपाथवरचे निवारे. त्यासाठी सुरुवातीला दिलेले अमुक शे नाही तर तमुक हजार; जाता–येता चिरीमिरी आहेच ! ना पाणी ना उजेड, स्वच्छतेच्या प्राथमिक सोयीही नाहीत. तरीही माणसं दुथडी भरून मुबईत वाहताहेत ! कशासाठी ? पोटासाठी ! हे पोट आहे ना ? बायांनो, पण मुबईतच का ? काहीना दुसरा पर्याय असत नाही. काहीना दिसत नाही !

हा अंकुश घरून पळून मुबईत आला. का रे ? अवो, तिकडे लई कट्टाळा यायचा. शेतीचं काम लई कटकटीचं आणि कष्टाचं तेव्हा आलं झालो पळून ! बापाला काय पत्ता लागू दिला नाही. इथं मिलमधी काम करायला झकास वाटतं. शिवाय इथं सिनेमा आहे. हे आहे, ते आहे, बरंच आहे कायकाय. आता तुम्हा बाया-माणसाला काय सांगायचं ? पण जिवाला जरा विरंगुळा मिळतो, 'बॉम्बेला राहतो' असं सागायला पण कशा गुदगुल्या होतात बघा ! मुबई म्हणजे सोन्याचं अंडी देणारी कोंबडी. इथं कोणीही या. रोगराईनं मराल एक वेळ, पण उपाशीपोटी मरायचा चान्स कमी !

खरं आहे बाबा; पण ती कोंबडी कापूनच खायचं म्हटलं तर कसं व्हायचं ?

बिचारी महानगरी मुबई ! साऱ्यांना आपल्यात सामावून घेते. जगण्याच्या बऱ्यावाईट वाटा त्याच्यापुढे ठेवते. हीही माणसं भाग होतात मुबईचा. तुमच्या घरी भांडी घासायला येतात. तुमची गाडी पुसतात.

'पुलं'नी एकदा का पेटीवर सूर लावला,
की ऐकणाऱ्याची तबीयत खूष होऊन जाते.
सर्व वातावरणाचं आणि त्या सुरांचं
काहीतरी नातं आहे असं जाणवतं.
'पुलं'च्या या पेटीतून जादूगाराच्या सफाईने बाहेर
पडतात सच्चे सूर! मग ते कधी असतात पहाटेचं
वातावरण फुलवून टाकणाऱ्या तोडी रागाचे,
तर कधी उदास मुलतानीचे... हुरहुर लावणारे.
तर कधी हे सूर काळाचे पडदे अलगद दूर करून
बालगंधर्वांच्या काळात नेऊन सोडतात
आणि श्रोताही त्यांच्याबरोबर
मनात गुणगुणू लागतो – प्रभू अजि गमला...
असा मजा येतो आणि
नकळत उत्स्फूर्त दाद जाते
वा! क्या बात है! मग ती
पेटीच गायला लागते! पुलंची
अशीच एक सजीव आणि
सर्वांना हवीहवीशी वाटणारी
सदाबहार मैफिल –
आता कॅसेटमध्ये
उपलब्ध.



# असे मस्त सूर लागलेत भैय्या!

## अलूरकर म्युझिक हाउस

४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे ४११००४ फोन – ३०६६२.

**प्रसिद्धी सप्टेंबरमध्ये. आगाऊ नोंदणी १ ऑगस्ट ते २० ऑगस्ट १९८१.**

PROGRAF/AMH/81

तुमच्या बागेची देखभाल करतात. तुमच्या घरचे जुने कपडे, भंगार, डबा–बाटल्या विकत घेतात. संध्याकाळी बाजारात मिरची, कोथिंबीर विकताना भेटतात. गिरण्यांतून काम करतात. गावी जाऊन ती काय करणार ? आणि ती गेली तर तुमच्या-आमच्या घरी धुणी–भांडी कोण करणार ?

अरे, या माणसांचं उदरभरण महत्त्वाचं, की तुम्हा संकुचित वृत्तीच्या, ‘बूर्ज्वा मध्यमवर्गीयां’च्या शहराच्या डिसेन्सी, स्वच्छता आणि सुरक्षितता महत्त्वाची ?

–सुरक्षितता आणि स्वच्छता काय फक्त मध्यमवर्गीयांची आहे ? अरुंद रस्त्याच्या धोक्याच्या आणि मोक्याच्या जागी झोपड्यांची दाटी, वळणावर उलटणाऱ्या बसेस, कलंडणारे ट्रक्स. मरणारे काय फक्त मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीय असतात ? काही वर्षांपूर्वी दादरच्या टिळक पुलाजवळ एक मध्यमर्गीय मुलगा वाहनाखाली सापडून मेला. कारण फूटपाथवरील झोपड्या आणि फेरीवाल्यांची गर्दी ! दादर भागातल्या रहिवाशांनी ताबडतोब उत्स्फूर्त निदर्शनं केली. तेव्हा झोपडपट्टीवालं कुणी मेलं तर ? ‘फूटपाथवर ट्रक चढून चार ठार !’ अशा चार ओळींच्या बातमीपुढं काही जात नाही. का ही त्यांच्या बेकायदा वागण्याची क्रमप्राप्त सजा समजावी ?

काय भूमिका घ्यावी या माणसांबद्दल ? त्यांची लाचारी, त्यांची गरिबी. ठीक आहे; पण हा आहे क्रूर जीवनसंग्राम ! ‘सर्व्हायवल ऑफ द फिटेस्ट.’ मोलकरणीवर घर विसंबून तुम्ही बाहेर गेलात, तर निदान टेबलावरची चिल्लर तरी नाहीशी होणारच ! ही माणसं काय माणसं राहिली आहेत ? पशु झाले आहेत त्यांचे ! कुणी केलं त्यांना पशू ? त्यांनी स्वतः ? तुम्ही–आम्ही ? की परिस्थिती नावाच्या मोक्याच्या वेळी धावून येणाऱ्या एका चेहराहीन आणि सोयीच्या घटकानं ?

आम्ही बोलत होतो, तेवढ्यात एक तरुण बाई तीरासारखी घुसून मधोमध येऊन उभी राहिली. किशीच्या कोरून सेट केलेल्या भुवया, प्लास्टिक जरीची साडी हे सारं तिचा व्यवसाय सांगायला पुरेसं होतं. बोलणं अक्कडबाज आणि तद्दन फिल्मी ! कोर्टानं ‘स्टे’ कसा आणला वगैरे. ‘उंची हवेली के सेठ लोग,’ ‘गरिबोंकी इज्जत’ ‘इन्सानियत तबाह हो गयी’ असे जड जड शब्द. उद्योगधंद्यासाठी मुंबईत आलेल्या माणसांना नुसतंच मांजरासारखं गावी नेऊन टाकून काय होणार ? या माझ्या प्रश्नाला किशीकडे उत्तर होतं. पोलिसांच्या मदतीनं ती भुसावळहून पळून आली होती.

असे आणखीही किती तरी आले असतील. मुळातला पोटा-पाण्याचा प्रश्न जोवर सुटत नाही, तोवर आणखीही कित्येक मुंबईत लोटतील. त्यांची चिंता आहे रोजच्या पोटाची ! येणारा प्रत्येक माणूस आपल्यासाठी काही करेल याच अपेक्षेनं ते घोळक्या-घोळक्यानं तिष्ठत बसले आहेत. मी परत निघाले तेव्हा लछमीबेनची दहा–बारा वर्षांची फटाकडी मुलगी आपल्या आईला म्हणाली, ‘माँ, जवाबे नी इन लोगको।’ अग, हे लिहिणारे आहेत, ते करणार काही नाहीत !

मी फक्त आवंढा गिळला.

यांच्यासाठी आपण काही करू शकतो का ? यांच्या दुःख-दैन्यावर आपली प्रतिक्रिया काय असावी ? दया आणि कळवळा ? सिंपथी किंवा एंपथी ? ओशाळेपणा की तत्त्वज्ञानी स्थिरचित्त शांतता ? भडकती चीड आणि तिरस्कार ? यापैकी नेमक्या कशाने यांचे प्रश्न सुटतील ? उद्योगधंद्यांचं विकेन्द्रीकरण होणार कसं ? साधा कांदे-बटाटे-बाजारसुद्धा अजून मुंबईबाहेर हलत नाही, तिथे खेड्या–पाड्यात कुठले उद्योग पोचणार ?

पण मग हा प्रश्न तरी कसा सुटणार ?

असं करावं की, हा प्रश्न सोडवायला एक समिती नेमावी, म्हणजे समितीच्या सभासदांचे तरी प्रश्न सुटतील !

–ललिता बर्वे



धर्मांतर दोन प्रतिक्रिया

# गुमानरावाची बायको पळाली त्याची गोष्ट

डॉ. शरद अभ्यंकर

आमच्या गावात गुमानराव नावाचा एक माणूस होता. तसा तो भित्राच; पण बाहेर कुठं आपलं काही चालत नाही याचं उट्टं तो आपल्या बायकोवर काढायचा. एके दिवशी गुमानरावाच्या गल्लीत भलतीच गडबड उडाली. असं झालं, वर्षानुवर्षांच्या जाचाला कंटाळून गुमानरावाची बायको एका मुसलमानाबरोबर पळून गेली! त्याबरोबर, गल्लीत आणि गावातही हाहाःकार उडाला. देवा-धर्मानि जन्मगाठ बांधून दिलेल्या नवऱ्याला सोडून ही बाई पळते याचे सर्वांनाच नवल वाटले. लगोलग ठिकठिकाणचे पत्रकार येऊन गुमानरावाच्या मुलाखती घेऊ लागले. काहींनी बाईचा शोध काढून तिच्याही मुलाखती घेतल्या. त्यातील काही निवडक भाग–

प्र. तुम्ही बायकोला नीट वागवत होता का?

उ. आता आणखी काय नीट वागायचं? वाड्याबाहेर तिला स्वतंत्र खोली होती, पाणी प्यायला स्वतंत्र आड होता.

प्र. तुम्ही तिला मारहाण करत होता म्हणे...

उ. आता मी माझ्या बायकोला मारहाण नाही करणार तर काय तुमच्या?

प्र. तुम्ही दारू पिऊन मटणाची जेवणं झोडायचा आणि तिला शिळं पाकं खायला लावायचा..

उ. शिळंपाकं का होईना, देत होतो ना?

प्र. तिला काही शिक्षण वगैरे?

उ. आता आम्हालाच शिकून बेकार व्हावं लागतंया, तिथं त्याना शिकवून आणि घर कशाला घाला त्यात?

प्र. तुमच्या मनाने बायकोने पळून जाण्याचे कारण काय असावे?

उ. त्या हुसन्याचा भाऊ कुवेतला आहे. त्याने साल्याने माझी बायको पळवायला पैसे पाठवले असले पाहिजेत!

प्र. तर काय! अहो, जाऊन जायचं तर एखाद्या आपल्याच जातवाल्याकडं जायचं. मागं नाही नागपूरला असंच भलं जंगी पलायन झालं होतं. काढला आम्ही काही आवाज? तेव्हा तुम्ही तरी किती मुलाखती घेतल्या? पण हे मुसलमानाबरोबर जाणं म्हणजे फारच झालं. चागल्या नांदत्या बाईनं असं करणं म्हणजे अक्रीतच!

प्र. हुसन्याकडे ती सुखी होईल का?

उ. नाव सोडा! अहो तो आमचाच गाववाला. नाही चार दिवसात परत आली तर नाव बदला! आम्ही बरे, असा त्याचा हिसका आहे.

प्र. परत आलीच तर यापुढे तरी नीट वागवाल का?

उ. येऊ दे तर खरी, चपलेनेच टाळके सडकीन! साला 'वसुधैव कुटुंबकम्' मानणाऱ्या गुमानरावाचा अपमान? त्याच्याच कुटुंबाकडून?

प्र. आता तरी इतर गावकऱ्यांनी आपल्या बायकांना प्रेमाने वागवावे असे तुम्हाला वाटते का?

उ. वागवणारे वागवू देत; पण खरे म्हणाल तर पायातली वहाण पायातच ठेवायला हवी!

प्र. हे तुम्हाला कोणी शिकवले?

उ. आमचेच प्रमुख गुरव ते म्हणतात. हीच परंपरा आहे. तीच मी मानणार! धर्म बदलूच शकत नाही. जुन्या पद्धती फार चांगल्या आहेत. त्यात बदल करणे म्हणजे राजकारण आहे.

### गुमानरावाच्या पत्नीची मुलाखत

प्र. बाई, तुम्ही आता सुखी आहात का?

उ. निदान माणूस म्हणून जगते आहे. हे सुखच मला पुरे आहे.

प्र. इथे तुम्हाला जास्त जाच झाला तर?

उ माझी जी परिस्थिती होती त्यापेक्षा वाईट कुठली असूच शकत नाही. त्यामुळे माझ्या दृष्टीने हे सुखच आहे.

प्र. तुम्ही हुसन्याच्या ऐवजी जातवाला का नाही निवडलात?

उ, मग तुम्ही लोक आतासारखे खडबडून जागे झाले असता का? माझ्या उदाहरणावरून शहाणपणा शिकून इतर गाववाले तरी सुधारतील ही आशा! माझा नाद गुमानरावांनी आता सोडून द्यावा! ◻


**New Titles Received**

1. **The Pritikin Program for Diet and Exercise** (a sensible diet–Best-seller)–Nathan Pritikin & Patrick M. Magrady
2. **The Americans** (Letters from America for long life on Current American topics 1969–1979)– Alistair Cooke
3. **From Them To Us** (Memoris of a IGP.)– N. M. Kamte

१. बांसरी (कथासंग्रह)– वसुधा पाटील
२. जिव्हार स्वानंदाचे (लेखसंग्रह)– विजया राजाध्यक्ष
३. पत्रावळ (कथासंग्रह)– केशव मेश्राम
४. सुखाच्या रात्री (प्रवासवर्णन)– रमेश मंत्री
५. घर हरवलेली माणसं (कथा)– व. पु. काळे

◻ *Good furniture, Car and T. V. will not make you cultured. Books will For inwardly and outwardly beautiful books.*

The Phoenix Library
727 Sadashiv Peth, Pune-30.

# मुंबईच्या मसुराश्रमाचे कार्य

शुद्धिचळवळ नवी नाही. सहस्र वर्षांपूर्वी मुस्लिम व ख्रिस्ती आक्रमकांनी बाटवाबाटवीचे अमानुष प्रकार जेव्हा भारतात सुरु केले तेव्हाच महर्षी देवलांनी शुद्धिसंस्कारांचा घोष करुन या बाटलेल्यांना परत हिंदू धर्मात घेण्यास प्रारंभिले होते. मसुराश्रम मुंबई, हे कार्य गेली साठ वर्षे वैयक्तिक व सामूहिक स्वरुपाने अखंड करीत असून शुद्धिकृतांना हिंदु समाजातील सर्व जाति-पंथात त्यांच्या इच्छेप्रमाणे व इतिहासाप्रमाणे सन्मानाने समाविष्ट करीत आहे.

---

## मसुराश्रमात जुलै महिन्यातच झालेले काही शुद्धि व विवाहसमारंभ

(१) यू. जे. भालेराव या पुण्याच्या प्रॉ. ख्रिश्चन नर्स युवतीने हिंदु धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव उषा असे ठेवण्यात आले. व विवाह श्री. तुकाराम शिवाजी हातिस्कर या युवकाशी पार पडला आहे.

(२) श्री. चंद्रकोश नावाच्या हिंदू रजपूत व्हायोलिनवादक युवकाचे प्रेम सायरा खान नावाच्या मुस्लिम तरुणीशी झाले होते. सायराची आई हिंदूच होती. तिचे वडील तफसील हुसेन यांनी तिला मुसलमान पंथ स्वीकारायला भाग पाडले होते. चंद्रकोश व सायरा यांच्या प्रेमाची वार्ता आश्रमात आली होती. सायराची इच्छा हिंदुधर्म स्वीकारून विवाह करण्याची होती परंतु सायराच्या वडिलांनी व त्यांच्या मित्रांनी चंद्रकोशाला काजीकडे नेऊन, त्याच्या मुळीच मनात नसतानासुद्धा मुसलमान होणे भाग पाडले व त्याचे नाव इम्रानखान ठेवून मग सायराशी त्याचा निका लावला होता. अशा प्रकारे बळाने लागलेला हा निका सायरालाही मान्य नव्हता. या दोघांना महिनाभर जवळजवळ कोंडूनच ठेवले होते. सायरा व चंद्रकोश मोठ्या अडचणीत सापडले. चंद्रकोशच्या आई–वडिलांनी व मित्रांनी ब्रह्मचारी विश्वनाथजीगुरुजी यांची भेट घेतली. त्यांनी अनेक मित्रांना दूरध्वनी केले. अखेर चंद्रकोश व सायरा त्या मुसलमानांच्या कचाटघातून सुटले व आश्रमात आले. मध्यंतरीच्या काळात या दोघांचा स्वीकार व संरक्षण व्हावे, अशी मनाची व व्यवहाराची सिद्धता चंद्रकोशच्या नातलगाची करण्यात आली. हे दोघे आश्रमात आल्यावर नैर्बंधितदृष्ट्या ज्या गोष्टी पुऱ्या करावयाच्या त्या सर्व करून चंद्रकोशच्या नातलगाच्या उपस्थितीत शुद्धीकरणविधीने दोघांनाही हिंदु धर्मात घेण्यात येऊन विवाहविधी संपन्न झाला. सायराचे हिंदू नाव माधवी असे ठेवण्यात आले. इम्रानखानचे नाव चंद्रकोश हे पांहलेच ठेवण्यात आले. माधवीला तिच्या इच्छेप्रमाणे तिच्या आईच्या हिंदु धर्मात येऊन विवाह झाल्याने समाधान असून दोघेही आता सुरक्षित, सुखात आहेत. या संकटातून मुक्त होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी सहाय्य केले, त्या सर्वांचे या पति–पत्नीनी आभार मानले आहेत.

(३) श्री. जे. येल. कल्लीकाडन या केरळीय रो. कॅ. ख्रिश्चन युवकाने हिंदु धर्माचा स्वीकार केला. त्याचे नाव प्रताप असे ठेवण्यात आले व विवाह अपर्णा र. मेडणेकर या हिंदु युवतीशी पार पडल.

## मुस्लिम महिलेची छळातून मुक्तता

(४) खातून अेच. काजी ही मुस्लिम महिला आपल्या घरात अमानुष छळात दिवस कंठीत होती. मसुराश्रमात येऊन तिने आपली दु:स्थिती ब्रह्मचारी विश्वनाथगुरूजीना सांगितली होती. श्री. दिलीप विश्वनाथ या हिंदु तरुणाने तिची सुटका केली. त्याला मित्र-मैत्रणीचे साहाय्य व श्रीमती घाटगे याचे मार्गदर्शन लाभले होते. खातून काजीने हिंदु धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव सीमा असे ठेवण्यात आले व विवाह दिलीप विश्वनाथ याचेशी यथासांग पार पडला. सीमा आता हिंदु कुडाळदेशकर समाजात सन्मानाने समाविष्ट झाली आहे. सौ. सीमाचा हा वृत्तांत, एक उद्बोधक कथाविषय होणारा आहे.

(५) एल. एल. फेराव या मुंबईच्या रो. कॅ. ख्रिश्चन युवतीने हिंदु धर्माचा स्वीकार केला. त्यानतर तिचा विवाह श्री. विनय मधुसूदन सावले या हिंदू देवरुखे ब्राह्मण युवकाशी मालाडच्या रुईया हॉलमध्ये पार पडला. कन्यादान श्री. म. वि. आरेकर यानी केले.

(६) शीला नाथन रोहेकर या बेनेइस्रायल पदवीधर युवतीने हिंदु धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव विजयंती असे तिच्या इच्छेप्रमाणे ठेवण्यात आले.

## धूर्त वकिलापासून सावध रहा

(७) जे. ए. डिसोझा या वसईविभागातील रो. कॅ. ख्रिस्ती युवतीने हिंदु धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव ज्योती असे ठेवण्यात आले व विवाह श्री. सुरेश शंकर भोसले या हिंदु मराठा युवकाशी पार पडला.

शुद्धिविवाहाचे कामात काही भानगडी व संकट निवारण्याच्या कामी विधिज्ञाचे (वकिलांचे) सहकार्य अवश्य घ्यावे लागते व अगदी थोडी धर्माभिमानी मंडळी ते देत पण असतात; परंतु काही धूर्त वकील लोक अशा गरजू जोडप्याना गाठतात किंवा गरजू जोडपी (पदवीधर असूनही अज्ञानाने किंवा बादरटपणाने) वकीलाकडे जातात व मग धूर्त वकील या जोडप्यापासून पाचशे ते एक सहस्र रुपये घेऊन, कोणताही धर्मविधी न करता, रजिस्ट्रार ऑफिसमधून विवाहज्ञापन (मेमोरॅडम ऑफ मॅरेज) विनामूल्य मिळणारी पत्रके घेतात. त्यावर त्या जोडप्याची व कोणा तरी पुजाऱ्याची वा पुरोहिताची स्वाक्षरी घेऊन ते फॉर्म रजिस्ट्रार ऑफिसमध्ये देऊन त्याची पावती घेतात. (शासकीय निर्बंधाप्रमाणे या विवाहज्ञापनपत्रकावर केवळ पाच रुपयांचा कोर्टफीस्टॅंप लावावा लागतो.) ती पावती जोडप्याला देऊन तुमचे लग्न झाले व नोंदविलेही गेले आहे, असे सांगून पावती देऊन निघून जातात. आधी फी वसूल करूनच वकीलमहाशय हा उद्योग करीत असतात. विवाह विधिपूर्वक झाला आहे की नाही, याच्या चौकशीचा संबंध नोंदणी कार्यालयाशी नसल्यामुळे ते काहीच चौकशी करीत नाहीत. धर्म विधिपूर्वक हिंदु धर्माचा स्वीकार करून विवाह करू इच्छिणारे किंवा सर्वसाधारण विवाह करु इच्छिणारे जोडपे, ती केवळ पावती पाहून गोंधळून जाते व असमाधानी राहते आणि मग आपण फसल्याची त्याना जाणीव होते.

वरील श्री. भोसले हे, आपण अशाच एका वकिलाचे भक्ष्य झाल्याचे म्हणत होते.

मुंबईत विवाहनोंदणीचे कार्यालय एक बांद्रा येथे व दुसरे ओल्ड कस्टम-हाउस येथे आहे. त्या कार्यालयांच्या बाहेर अशा प्रकारे उपद्व्याप नेहमीच होत असतात. वरील प्रकारच्या तक्रारी मसुराश्रमात अधूनमधून येत असतात. तेव्हा शुद्धि व विवाह हे या आश्रमाचे सततचे कार्य असल्यामुळे अशा बंधु-भगिनींनी संपर्क साधावा किंवा त्यांनी धर्माभिमानी ध्येयवादी कार्यकर्त्यांना भेटावे. सरळपणाने होणाऱ्या शुद्धि-विवाहासाठी किंवा सर्वसाधारण विवाहासाठी वकिलाची मुळीच आवश्यकता लागत नाही. वकिलाचे साहाय्य घ्यावयाचे असेल तर धर्माचारावर श्रद्धा असलेल्याचेच घ्यावे, एवढीच सूचना आहे.

(८) व्ही. एस. रॉड्रिक्स या मुंबईच्या रो. कॅ. ख्रिश्चन युवतीने हिंदु धर्माचा स्वीकार केला. तिचे नाव वनिता असे ठेवण्यात आले,

(९) बी. के. एन. जॉर्ज या केरळीय रो. कॅ. ख्रिश्चन युवकाने हिंदुधर्माचा स्वीकार केला. त्याचे नाव बाळकृष्ण पाटील असे ठेवण्यात आले. पुढे वनिता व बाळकृष्ण पाटील यांचा विवाह आश्रमात पार पडला. कन्यादान श्री. र. ग. बेलापूरकर व सौ. सीमाबाई बेलापूरकर यांनी केले.

वरील सर्व कार्यक्रम ब्रह्मचारी विश्वनाथजी यांनी आश्रमीय विद्यार्थ्यांच्या साहाय्याने पार पाडले: श्रीमती कुंदाताई परांजपे यांनी शुद्धिकृताचे स्वागत केले. कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री. हर्डीकर यांनी केले.

प्रत्येक कार्यक्रमानंतर ब्रह्मचारी विश्वनाथजीगुरुजी यांनी धर्मविधीचे व शुद्धि चळवळीचे महत्त्व आणि भावी उत्तरदायित्व समजावून सांगून वधू-वरांना शुभाशीर्वाद आणि गीताग्रंथ व पांडुरंगाचे सुंदर चित्र भेट म्हणून दिले.

## कर्णावती 'अहमदाबाद' येथे शुद्धिसमारंभ

(१०) कर्णावती (अहमदाबाद) येथील श्रीमती प्रमिलाबाई व्ही. जमीनदार या प्रॉ. ख्रिश्चन पोक्त भगिनीने मोठ्या श्रद्धेने आपल्या पदवीधर कन्या (१) कु. वर्षा जमीनदार (२) कु. व्हीला जमीनदार व मुलगा (३) कु. विलास जमीनदार यांचेसह समारंभाने हिंदू धर्माचा स्वीकार केला.

हा कार्यक्रम येथील वेदमंदिरात मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत पार पडला. त्यासाठी आदरणीय ब्रह्मचारी विश्वनाथजी, श्री. हर्डीकरशास्त्री व श्री. भाऊराव पाटील हे कर्णावतीला गेले होते. शुद्धि- समारंभानंतर श्रीमती प्रमिलाताई, कु. वर्षा व व कु. विलास ह्यांची नावे तीच कायम करण्यात आली. द्वितीय कन्या व्हिला हिचे नाव 'विमल' असे ठेवण्यात आले.

शुद्धीकरणानंतर कु. वर्षांचा विवाह श्री. सत्यविक्रम महादेव जोशी या पदवीधर हिंदू को. ब्रा. युवकाशी थाटात पार पडला. या कार्यक्रमाला वेदमंदिराचे महंत रविमुनी, भारत सेवाश्रमसंघाचे स्वामी अक्षयानंदजीमहाराज, महाराष्ट्र समाजाचे अध्यक्ष श्री. दर्प, श्री. डॉ. विनोद, डॉ. वणीकर इत्यादि बरीच प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती.

ब्रह्मचारी विश्वनाथजी यांनी आपल्या आशीर्वादपर भाषणात शुद्धिचळवळीचे महत्त्व, तसेच शुद्धिकृतांचे व विवाहितांचे कर्तव्य समजावून सांगितले.

श्रीमती प्रमिलाताई जमीनदार यांनी मोठ्या कृतज्ञतेने ब्रह्मचारीजींचे आभार मानले.

## शुद्धिसत्यनारायणाची पूजा

सौ. गौरी विजय खेडेकर व श्री. विजय रमाकांत खेडेकर यांचा शुद्धि व विवाह आश्रमात वर्षप्रतिपदेला झाला होता. सौ. गौरी हिने खोजा इस्माइली पंथ सोडून हिंदु धर्माचा स्वीकार केला होता. शुद्धि व विवाहानंतर काही काळ या दोघांना त्रास सहन करावा लागला; परंतु पुढे ब्रह्मचारीजींच्या खटपटीमुळे लगेचच सर्व सुरळीत झाले व मग सत्यनारायणाची पूजा व वधू-वराचा भव्य सत्कार-समारंभ, वेसावा (मुंबई) येथे पार पडला.

ब्रह्मचारी विश्वनाथजीगुरुजी आपल्या सहकाऱ्यांसह वधू-वरांना आशीर्वाद द्यावयास, सत्यनारायणाचे दर्शनास व जमलेल्या मंडळींना समजावून सांगण्यास उपस्थित होते.

सौ. गौरीच्या अनेक खोजा इस्माइली मैत्रिणी व नातलग या समारंभास आले होते.

शुद्धि चळवळीचे यश अशा प्रकारच्या आनंदात आहे.

—व्रजमोहन

---

## स्वातंत्र्यवीर सावरकर जन्मशताब्दीनिमित्त लेखस्पर्धा

भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जन्मशताब्दी समारोहाला २८ मे १९८२ पासून सुरुवात होत आहे. नागपूरच्या विजय प्रकाशनने या निमित्त एका विशेष ग्रंथाचे संपादन करावयाचे ठरविले आहे. हा ग्रंथ २८ मे १९८२ ला प्रसिद्ध होईल. त्यासाठी एक संपादकमंडळही नेमण्यात आले आहे.

या ग्रंथात सावरकरांच्या विविध पैलूंची समीक्षा करणारे लेख असतील. लेखांपैकी काही लेख मान्यवरांकडून मागविण्यात येतील. तीन लेख ह्या स्पर्धेतून निवडण्यात येतील. या स्पर्धेच्या अटी व इतर माहिती पुढीलप्रमाणे.

(१) स्पर्धेसाठी पुढील विषय जाहीर करण्यात येत आहेत.
- (अ) भारतीय जातीव्यवस्था आणि सावरकर
- (ब) सावरकरांचा पुरोगामी राष्ट्रवाद.
- (क) साहित्यिक सावरकर : एक मूल्यमापन

(२) वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर लेख पाठविता येईल; परंतु एका स्पर्धकाला कोणत्याही एका विषयावरच लेख पाठविता येईल.

(३) लेखाची मर्यादा सुमारे तीन हजार शब्दांची असावी.

(४) लेख फुलस्केप कागदावरच एका बाजूने भरपूर समास ठेवून सुवाच्य अक्षरात असावा.

(५) लेख पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ ऑगस्ट १९८१ हा आहे. या दिनांकाला लेख खालील पत्त्यावर पोचले पाहिजेत. विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपूर ४४००१२.

(६) विजयी स्पर्धकांना रोख बक्षिसे देण्यात येतील प्रत्येक विषयासाठी क्रमांक १ व २ अशी एकूण ६ बक्षिसे असतील. पहिले पारितोषिक ७५ रुपयाचे व दुसरे पारितोषिक ५० रुपयांचे असेल. पारितोषिके जरी सहा असली तरी सर्वोत्कृष्ट केवळ तीनच लेख सावरकर गौरव ग्रंथात समाविष्ट होतील.

(७) लेखात अवतरणप्रचुरतेपेक्षा सर्वांगीण समीक्षा आणि आजच्या संदर्भात सावरकर विचारांचे मोल या मुद्द्यावर अधिक भर अपेक्षित आहे.

(८) या स्पर्धांसाठी संपादक मंडळाचा निर्णय हा अंतिम राहील.

विनीत

जगदिशचंद्र उपाध्याय
विजय प्रकाशन, हनुमान गल्ली,
सीताबर्डी, नागपूर ४४००१२

# असहाय्य ' ती '

काल ती माझ्याकडे आली.

ओळखीची ना पाळखीची.

चालणंही अतिमंद— एकेक पाऊल मोजत, काठी टेकत टेकत आली. काठीच्या आधारा-शिवाय चालणंही मुश्कील होत असावं. वयस्कर दिसत होती.

सुरकुतलेला, पण शात, सौम्य, खानदानी चेहरा. चार ठिकाणी शिवलेलं अंगावरचं पातळ.

ती आजारी असल्याचं स्पष्ट जाणवत होतं.

ती आपल्या मुलीच्या नोकरीसाठी विचा-रायला आलेली होती.

मी असमर्थता प्रगट केल्यावर मिनिटभर तशीच उभी राहिली. मग काही न बोलता खुर्चीवर बसली.

मी ' काय ' विचारायच्या आतच तिनं सुरू केलं—

ती बोलत होती—तिचं गोड आवाजातलं दर्दभरं हिंदी ऐकण्यासारखं होतं. मी फक्त ऐकत होतो.

' घरात कोणी मर्द माणूस नाही, फक्त मी आणि माझी मुलगी. पदवीधर झालेली. असल्या तालुक्यासारख्या अर्धवट गावात मुस्लिम मुलीनं एवढं शिकणं फारच झालं. कॉलेज शिकलीये, जोडीला टायपिंग आणि शिवणकामही येतंय.

'तीनएक—दोन वर्षं ' ब्रेक ' घेत सरकारी खात्यात नोकरी केली.

' पण दोन वर्षं काम करूनही ' टेम्परररी ' म्हणून कमी केलं.

' त्यानंतर नुस्तच अर्ज करणं चालूये— मुलाखतीला एखादं बोलावणं येतं— पण मग नंतर फक्त उत्तराचीच वाट बघत बसा-यला लागतं.

'घरात कमवायला कोणी नाही,उत्पन्नाला काही मार्ग नाही.

'सरकारनं संजय गांधीच्या नावानं निराधार योजना सुरू केली.

'माझ्या नावाचा एक अर्ज मुलीनं भरला, पुढाऱ्याला विनवलं,

' स्वतःच्या खिशातले पैसे द्यावे लागतात अशा आविर्भावात त्यानं आढेवेढे घेतले.

' एकदाचा अर्ज मंजूर झाला—

पहिल्या महिन्याचे साठ रु. हातात पडले. तेवढाच पोटाला आधार !

' दुसरा महिना आला—पैश्याबद्दल विचा-रायला गेले, तर तो कचेरीतला कारकूनच गुरकायला लागला.

' फार मागं लागले तेव्हा कुठं बोलला, म्हणाला— तुमचं आडनाव चुकीचं लागलंय— तुम्हाला नाही पैसे मिळायचे !

आता कोणाकडे जावं ? ना दाद ना फिर्याद !

' मुलीला पाठवलं तर म्हणतो—' एवढी जवान बेटी—कामधंदा करायला काय होतं ?' आपण माणसात राहतो की लाडग्यांच्या जंगलात कोणास ठाऊक ! सगळ्यांची नजर अशीच लाळघोटी— नियतच बिघडलीये— कोण काय करणार ?'

— तिचा सात्त्विक संताप स्पष्ट जाणवत होता.

' आम्ही खानदानी माणसं— एके काळी आमच्याकडं सुबत्ता नांदलेली. कोणतं काम करायला लाज वाटत नाही, कामाची तया-रीही आहे; पण कामच नाही !

' संजय गांधी निराधार ' बरोबरच दुर्बल घटकाना कर्जाची योजना होती. मुलीला शिवणकाम येतं म्हणून मशीनसाठी कर्ज मिळावं म्हणून अर्ज केला— बँकेत जाण्यात अर्थ नाही—तिथं मातब्बर जमीनदार, ओळख, वशिला, भरायला पैसे असं सगळंच हवं असतं— या असल्या भानगडी नाहीत म्हणून इकडं कचेरीत अर्ज केला.

' त्याची चौकशी करायला कचेरीत गेलं की तो कारकून कुत्सितपणे म्हणतो—

' तुमच्या नावाचं मशीन सरकार करून धाडणार आहे, आलं की कळवतोच !' सगळीकडचा हाच अनुभव— दाराशी उभं करायलाही कुणी तयार नसतं.

' काम मिळत नाही मग भिकेशिवाय पर्याय नाही !

' पण त्यासाठीही धैर्य लागतं—तेही आम-च्याजवळ नाहीये.

, मग फक्त गार पाणी प्यायचं आणि भिंतीकडं तोंड करून गप्प पडून रहायचं.

' आणि असं पाणी पोटात गेलं की उठ-णारी कळ असह्य करते.

' मग ओक्साबोक्शी रडणाऱ्या माझ्या मुलीच्या पाठीवरून हात फिरवण्यातही काही अर्थ उरत नाही. मग उगाचच वाटत राहातं उगीच शिकवली हिला, नसती शिकली तर जाणवणाऱ्या दुःखाची तीव्रता तरी कमी वाटली असती. आमच्यात एक म्हण आहे. ' घरात मुलीचं ' हायऽ ' ऐकणं, ही घराच्या भिंती कोसळण्याची लक्षणं असतात !'

' इथं तर रोजचं हायऽ हायऽ करायला लागतंय. आणि आमच्या ' बिरादरी 'बद्दल काय सांगावं ? आमचा रहात्या दोन खण जागेवर डोळा ठेवून बसलेली बिरादरी आम्ही कधी देशोधडीला लागतोय याचीच वाट बघत बसलीये.

' खायला अन्न नाही—कुणी दिलं तर खायचं, भीक मागायला लाज वाटते— हात पसरणं नकोसं होतं— असा बारा महिने ' रोजा ' करूनही अल्लाला दया येत नाही, मग दाद तरी कुणाकडं मागायची ?'

बोलणं संपलं तशी उठली. 'तुला उगाचंच तकलीफ दिली; पण बघ काय जमलं तर !' म्हणत क्षणभर उभी ठाकली— मग आली तशी काठीच्या आधारानं पावलं मोजत निघून गेली !

पण कुचकामी शिक्षण, किडलेली सर-कारी यंत्रणा, सौजन्याचा अभाव असलेली माणसं, पशुवृत्तीची ' माणूसपण ' हरवलेली माणसं, कोसळलेली समाजव्यवस्था अशा किती प्रश्नांचा गुंता निर्माण करून गेली ! सुन्न अस्वस्थता मागे ठेवून गेली !

विनय र. गुणे

संगमनेर

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

## उत्तरमीमांसा : १७ :

स. शि. भावे

# जुनी नावे....नवी नावे

वेळ : रात्री साडेबाराची. स्थळ : वेस्ट-एण्ड सिनेमाच्या आवारातले बैठे कॅंटीन. पात्रे : आम्ही पाचसहा मित्र.

लॉरेन्स ऑलिव्हिएचा वरवर खेळकर, पण आतून गंभीर चित्रपट, 'The Prince and the Show Girl' पाहून पाच–सात मिनिटे झालेली.

जोरात वाद चाललेला. चित्रपट ऑलिव्हिएचा की मेरिलिन मन्रोचा ?

'बाहेरून तन्हेवाईक, पण आतून मित्रा–अशा त्या ड्यूकची भूमिका ऑलिव्हिएनं कशी ढंगात केली आहे.' एकजण ऑलिव्हिएचा चाहता.

'पण तो काम करतो आहे, एका विशिष्ट शैलीनं अभिनय करतो आहे, हे जाणवतं. मेरिलिनचं तसं नाही. याच भूमिकेसाठी जणू ती जन्मली आहे असं वाटावं इतकं अकृत्रिम, प्रयत्नाचा वासही नाही, असं अप्रतिम काम तिनं केलं आहे.'– दुसरा. उघडच मेरिलिनचा चाहता.

'मला पटतं तुझं म्हणणं,' तिसरा दुसऱ्याला म्हणाला, 'खरं तर ती सेक्ससिम्बल. शिवाय सिनेमाच्या कथेत ती एक किरकोळ नटी आहे. संध्याकाळच्या भोजनासाठी बड्यांच्या निमंत्रणावरून त्यांच्याकडे जाणारी; पण तिच्या कामात कुठेही भडकपणा किंवा आगाऊपणा नाही. निरागस लडिवाळपणा आणि लहानपणापासून आलेल्या अनुभवानी- अपेक्षाभंग सहज पचविणारा करुणरम्य समंजसपणा–अरे, अशी भूमिका वठविणं फार दुर्मिळ !'

तिसरा इंग्रजी साहित्याचा अभ्यासक आणि म्हणून मराठीत समीक्षक म्हणून प्रसिद्ध होता. समीक्षक म्हणून त्याने प्रतिष्ठितांची साक्षही काढली. म्हणाला, 'पुलदेखील म्हणाले की मेरिलिनचं काम अप्रतिम झालं आहे. आपल्या आधीच्याच खेळाला आले होते ते !'

'हो. हो. निवडक इंग्रजी चित्रपटांच्या वेळी पुलंची नेहमीच गाठ पडते.'–पहिला.

मलाही आठवले. चारएक वर्षे झाली असतील. 'डेव्हिड कॉपरफील्ड' अलकाला लागला होता. एक आठवड्यासाठी म्हणून ताबडतोब गेलो. तर पुलही हजर ! साऱ्या बाल्कनीत आम्ही पंचवीस–तीसजण होतो. निवात एकतानतेने, अगदी एकटे, आपण खरेखरे स्वतः होऊन, चित्रपट अनुभवता आला होता.

हे सगळे आठवले; पण मी काहीच बोललो नाही. फक्त आठवीत राहिलो.

एव्हाना प्रत्येकाचे पहिले ऑरेंज संपले होते. 'पुन्हा फिरवू या का ?' दुसऱ्याने विचारले.

सर्वांना कल्पना पटली. याकूबला ऑर्डर सुटली. प्रत्येक ग्लासात दोन मोठे चमचे स्क्वॉश घालून एकापाठोपाठ एक ग्लास याकूब सोडाफौन्टनखाली धरू लागला. सगळे एकाग्रतेने सोडा भरण्याचा तो कार्यक्रम पाहू लागले. गेली वीस–पंचवीस वर्षे तरी हा कार्यक्रम सगळे पाहत होते; पण त्या अनुभवाचा ताजेपणा कमी झाला नव्हता. लहानपणी बर्फाच्या गाडीवर घेतलेल्या लाल गोळ्याचा ताजेपणा जसा कधी कोमेजत नाही, तसा !

आमच्यातला चौथा तर फौन्टरजवळ जाऊन उभा राहिला होता. फौन्टनमधून ग्लासमधल्या स्क्वॉशमध्ये जेव्हा सोडा फक्कन् सोडला जातो त्या वेळी त्याचे तुषार जवळ उभे असलेल्याच्या तोंडावर उडतात आणि त्या तुषारात स्क्वॉशचेही काही कण मिसळले जातात. हे तुषार उडवून घेणं त्याला फार आवडत असे.

तसे ते तुषार तोंडावर उडणे सर्वांनाच आवडत असे. म्हणून तर साऱ्यांनी आपापले ग्लास नाका–तोंडाजवळ नुसते धरले होते. प्रत्यक्ष घुटका घेण्याला प्रत्येकजण थोडा वेळ लावत होता.

त्या वेळी पुलंची अलकामधली भेट मला सांगावीशी वाटली. ती सांगून झाल्यावर एक वेगळाच फाटा फुटला.

'अलका केव्हा चालू झालं रे ?' पहिला.

'अठ्ठेचाळीस – एकूणपन्नास साली.'– चौथा.

'त्याची आणखी एक गंमत माहीत आहे का ?' तिसरा. 'काय, काय ?'– सर्वांना उत्सुकता.

'अरे, त्याला चागलं नाव सुचवावं म्हणून धारपानी पन्नास रुपयांचं बक्षीस लावलं होतं; पण 'अलका' हे नाव एकोणसाठ जणांनी सुचवलं. मग धारपांनी पन्नासात नऊ वाढवले आणि प्रत्येकाला एक एक रुपया पाठवून दिला !'

'काय वाटलं असेल रे प्रत्येकाला एक एक रुपया घेताना ?'–कळवळयानं पाचवा.

'बेश वाटलं'– पुन्हा अधिकारवाणीने तिसरा. 'अरे, आजचे एक प्राचार्य आणि दर्जेदार कथालेखकही या एकोणसाठात होते. त्यांनाही त्या रुपयानं त्या वेळी आनंद झाला होता !'

'बरोबर आहे. आनंद रुपयाचा नाही रे. नाव निवडलं याचा !'–पुन्हा कळकळीने पाचवा.

'आणि 'भानुविलास' हे नाव कुणी सुचवलं माहीत आहे का ?'–पहिला.

(नवा खेळ सुरू झाला, मनाशी म्हटलं, मगाशी 'अधिकारवाणी' हा शब्द ऐकला तेव्हा, 'आकाशवाणी' ऐवजी 'अधिकारवाणी' हा शब्द अधिक शोभून दिसेल, असं वाटलं होतं. त्या कल्पनेशी खेळत मी ऐकत होतो. ऐकायला मलाही आवडत होतं.)

'नाही बुवा. कुणी सुचवलं ?'– दुसरा व तिसरा.

तिसऱ्यानेही उत्सुकतेने विचारले, याचा पहिल्याला खरा आनंद झाला. कारण समीक्षक असल्याने असेल; पण तिसऱ्याला कधी आश्चर्य वाटायचे नाही. 'ऑब्व्हियस', 'रुटीन', 'हॅकनीड' अशा एकेका शब्दाने तो समोरच्याला आडवा करत असे. म्हणून

त्यानेही उत्सुकता दाखवावी, ही अपूर्वाई होती. पहिल्याने सुखाने उत्तर दिले, 'कवी मनमोहन !'

'अशी कल्पकता मनमोहनांचीच असणार.'– दुसरा अभिमानाने म्हणाला. तो मनमोहनांचा कट्टर होता.

'आणि 'विजय'चं आधीचं नाव काय होतं सांगा पाहू ?'–पुन्हा पहिला. निदान स्मरणात तरी तिसऱ्यापेक्षा वरचढ ठरतो आहो या दुर्मिळ अनुभवाने तो उत्तेजित झाला होता; पण इथे तिसऱ्याने अनपेक्षित चौकार लगावला.

'लि ना. चि. मं. म्हणजे लिमये नाट्य चित्रमंदिर आणि सिनेमा थिएटरचं नाव आदर्श थिएटर असं होत.'–तिसऱ्याने कोणात असावी तशी माहिती पुरवली.

मग हाच एक फाटा चालू झाला.

'निशात'चं आधीचं नाव ओडिअन (Odeon) होतं.'–पहिला.

'आणि 'अल्पना'चं न्यू शिरीन होतं.'– चौथा.

'त्याच्याही आधी नुसतं शिरीन होतं'– पहिल्याची वरताण.

'ग्लोब'चं आता श्रीनाथ झालं.' पाचवा.

'आणि 'पॅरेमाउंट'चं रतन झालं.' पुन्हा पहिला.

'हिंद विजय'चं नटराज झालं ते रे.'– दुसरा जरा तीव्रतेने म्हणाला. मूळचं नाव जोशींनी ठेवलं ते कसं देशभक्तीच्या भावनेनं ठेवलं होतं. स्वातंत्र्यसैनिक होते ना ते!' जोशांशी दुसऱ्याचा घरोबा होता. थोडं जवळचं नातंही होतं.

'खरं म्हणजे नावं बदलू नयेत.'–तिसरा विमनस्कतेने म्हणाला. 'नव्या नावात जुनी ओळख राहत नाही'

'सेंटिमेंटल होऊ नका मिस्टर.'– पहिल्याने तिसऱ्याला, आणि सर्वांनाच सूचना दिली. 'तो बघा सारं आवरून याकूब मघापासून कंटाळलाय. उठू या आता.'

ते ऐकून याकूबने खूण केली. खुणेचा आशय असा की, तुम्ही बसा हवा तेवढा वेळ. मी नाही तरी इथेच झोपणार आहे; पण आम्ही उठलोच.

कॅन्टीनच्या बाहेर पडता पडता याकूब म्हणाला, 'हे साहेब (तिसरा) म्हणतात ते खरं आहे. थेटरांच्या नव्या नावात जुनी गंमत नाही!'

हे अचानक होतं. इतक्या लक्षपूर्वक याकूब आमचं बोलणं ऐकत असेल असं वाटलं नव्हतं.

खरं म्हणजे वाटायला हवं होतं. कारण वीस–पंचवीस वर्षांचा हा रिवाज होता. वेस्टएण्डचा सिनेमा. रात्रीचा. थिएटर जेमतेम भरलेलं. सिनेमा इंग्रजी कधी मलताच छोटा. पावणेबारला संपायचा. सुरुवातही आरामात. साडेनवाला Wel–Come ची काच पडद्यावर झळकायची. मग 'भा. स. चि.'मग चार-पाच ट्रेलर सिनेमाइतके किंवा काही वेळा सिनेमापेक्षाही हे ट्रेलर आवडायचे.–मग जवळच कॅंटीन तिथे दीड–दोनपर्यंत ऑरेंज, लेमन, फौंटनरच्या सोडघात कधी दोनदा, कधी तीनदा. धरबंद असा नसे!

अशा प्रत्येक वेळी याकूब होताच. आमची टोळी त्यालाही आवडत असावी. आमच्या गप्पा व्हायच्या त्यांनाही ओळ नसे. एकातून दुसऱ्यात अशा विषयाच्या लुंट्या पिळत राहायच्या. दर वेळी याकूब त्या ऐकत असे. कधी पेंग घेई. कधी फारच लांबले तर चक्क झोपून मंद घोरे. ती आमची निघण्याची सूचना असे!

त्याचा हा प्रश्न सगळ्यांच्या मनात गेला.

आम्ही थिएटरबाहेर आलो. लाल देवळावरून गावाकडे चालू लागलो.

हवा थंड होती. प्रसन्न होती. पाऊस पडून गेल्याने डाबरी रस्ता मऊ, ओलसर झाला होता. वारा झोबत होता. सुखद चेतावणी देत होता डोक्यात जरा जरा चढत होता. नकळतच पावलं वेगानं पडू लागली. तिसरा मघापासूनच विमनस्क होता. आता या हवेनं सगळेच सेंटिमेंटल झाले.

'आता हे लाल देऊळ, याचं नाव बदललं तर आपल्याला ते आवडेल का ?' तिसऱ्याने पुन्हा प्रस्ताव मांडण्याच्या अभिनिवेशाने विचारले.

'पण मला कळत नाही, नाव बदलायचं तरी कशाला ?'– पहिला आता तिसऱ्याच्या भावनेत समरस झाला होता.

'अनेक कारणं असतात.' दुसरा विवेचनाच्या थाटात म्हणाला– 'देशप्रेमामुळे, स्वातंत्र्यानंतर आपण जुनी इंग्रजी नावं बदलली. सर्वांना आवडलं ना ते ?'

'सर्वांना आवडलं असं कशावरून म्हणतोस ?'तिसऱ्याने वादाचा पवित्रा घेतला.– 'अरे, 'कार मायकेल रोड'चा 'डहाणूकर पथ' झाला हे स्वतः डहाणूकरानाही आवडलं नसेल ?'

'नाही; पण देशप्रेमामुळं नावं बदलली तर काही गैर नाही. उलट ते योग्यच आहे.' आम्ही सऱ्यानी आमची देशभक्ती त्वरेनं प्रकट केली.

'तेवढं एकच कारण नसतं काही.'– दुसरा पुन्हा विवेचन करू लागला.– 'आता पॅरेमाउंटचं रतन झालं ते कन्येवरील मायेनं झालं. हिंद विजयचं नटराज झालं ते नव्या खरेदीनंतर नवी ओळख ठसावी म्हणून. न्यू शिरीन, न्यू अपोलो यातला 'न्यू' नूतनीकरणासाठी आला आहे!'

'काही वेळा, दिवाळं काढण्याआधी– देखील नाव बदलतात' पाचव्याने अनपेक्षित-पण खास माहिती दिली. अशा खास तपशीलाकडे त्याचे खास लक्ष असते.

'आणि खटावच्या कॉलिजचं यशवंतराव चव्हाणांचं नाव बदललं ते ? त्याचं काय कारण ?' चौथ्याने विचारले.

'तुलाच ते माहिती असणार ! मायणीचा ना तू ? कलेढोणमायणी, उफराटं पाणी, ही म्हण तुलाच चागली माहिती असणार.' दुसऱ्याने चौथ्याचा मुलूख ओळखून एकदम पटच काढला.

चौथा वरमला. पण नाउमेद झाला नाही. 'जनतेची इच्छा होती. ती मानायला नको ?' त्याने सध्याचा पॉइंट काढला.

'जनतेची की कॉलेजच्या मालकांची, रे ?' तिसरा उसळला.

'तेच ते. नाव मालकानीच बदललं; पण ते जनतेच्या इच्छेनं बदललं.' चौथा त्या भागातला, म्हणून मुत्सद्दी होता. त्या थाटात त्यानं उत्तर दिलं.

'जनता म्हणजे कुठली जनता ?' पहिला तिसऱ्याच्या मदतीला धावला.– 'गाव, जिल्हा, विभाग, प्रात, राष्ट्र, यातली कुठली जनता म्हणते की नाव बदला ? आपल्या मराठी जनतेनं मागणी केली की उत्तर-प्रदेशातलं अलाहाबाद हे नाव बदलून प्रयाग हे नवं नाव चालू करा, तर करतील ?'

'म्हणजे चालू करतीलच असं नाही, पण करतीलही. कारण कोणतं नाव द्यायचं हा त्याचा अधिकार असतो.' चौथ्याने घटनात्मक

थाटात उत्तर दिले.

'म्हणजे,नाव बदलण्याचा ज्याचा अधिकार तो नाव बदलतो असंच ना ?'–तिसऱ्याची तीव्रता कायम होती, नव्हे वाढलीच होती.

'होयच मुळी. लग्नानंतर नाही का नवरा बायकोचं नवीन नाव ठेवतो ? आणि आडनाव तर आपसूख बदलतं.' चौथा. त्याला या उदाहरणाचा आधार स्वागतार्ह वाटला.

'नाही हं. हल्ली बायकोला विचारून, तिला हवं असलं, तरच नाव बदलतात.' पाचवा. पुन्हा कळकळीने.

'अगदी स्वानुभव का ?'–दुसरा.

'पण आडनावाचं काय ? ते तर बदलतंच ना ?'–चौथा. अधिक ठामपणे. 'ते काही नाही. नवीन अवस्था सुरू करायची की नाव बदलावंच लागतं. U. S. S. R, U. K. U. S., U. A. R–ही नवी नावं उगीच आली का ? नव्या सामाजिक दृष्टीसाठी ही नवी नावं आली.'–ही आंतरराष्ट्रीय उदाहरणं सुचल्याने चौथा स्वतःवर बेहद्द खूष झाला होता.

'म्हणजे धर्मांतर केल्यावर जशी नवी नावं ठेवतात तशी ? नारायणनचं खलीफ महंमद करायचं, एवढचं ना ? या नव्या नावानं आईला पत्र लिहिताना त्याला वेगळी दृष्टी वाटत असेल ना ?' तिसऱ्याचे कशानेच समाधान होत नव्हते. म्हणून त्याने ताजी बात काढली.

'बायकोचं काही धर्मांतर झालेलं नसतं.' तिसऱ्याचे विषयांतर दाखवता आले म्हणून चौथा आनंदित.

'उगीच कुठला तरी विषय इथे घुसडू नको.'

'माझं म्हणणं काय, की धर्म बदलणं काय, नाव बदलणं काय, सक्तीनं होऊ नये.' तिसऱ्याने संगती प्रस्थापित करण्याचा क्षीण प्रयत्न केला.

.. या वेळपर्यंत आम्ही नव्या पुलापर्यंत पोचलो. कधी, प्रशस्त दगडी कठड्यावर ऐसपैस बसलो; कधी कावली एक एक करीत तोंडात फेकणे सुरू केले; कधी कशाचीच जाणीव नव्हती.

¤

आठवणी सहज निघाल्या आणि त्यातून वाद काय निघाला ? तोही सरळ एका मार्गाने जात नव्हता. तर्क आणि भावना एकमेकात मिसळत होते.

मीही अकल्पितपणे रस्ताभर गप्प होतो. मला तर त्याचे आश्चर्य वाटलेच. पण इतरांनाही वाटले. तिसऱ्याने मला हटकले, 'का रे, गप्प ?'

मी गप्पच राहिलो. गप्पपणे चालू लागलो. मनात इतके प्रश्न येत होते. काही सरळ, काही विक्षिप्त.

याकूबला नावे बदलणे का नको होते ? तिसऱ्याला का नको होते ? चौथ्याला हे बदलणे कसे नीट कळत होते ?

नावे खरोखरी बदलली जातात का ? लकडी पुलाचा अजूनही लकडी पूलच राहिला आहे !

नावे बदलली तर काय होईल ? समोर शनिवारवाडा होता. मनात आले, याला 'पेशवे-बुरुज' असे नाव दिले तर ? याकूबचे तिसऱ्याचे, माझे-अशी सगळयांची नावे बदलली तर ? जनतेने तशी इच्छा व्यक्त केली तर ?


एकाही प्रश्नाचा उलगडा होत नव्हता. नवे–नवे प्रश्नच तयार होत होते.

मी गप्प गप्प घराकडे निघालो. मनात एक आशंका होती- दारावर टकटक केल्यावर आतून प्रश्न येईल, 'कोण आहे ?'

तेव्हा मी कोणते नाव सांगेन ? □


# प्रसिद्ध झाले

शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांचे व्यक्तिमत्त्व व विचार सादर करणारे, तसेच त्यांच्या व कै. माधवराव बोरस्ते, श्री. प्रल्हाद पाटील, श्री. माधवराव मोरे इत्यादींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या नासिकच्या ऊस–शेतकरी–आंदोलनाचा चक्षुर्वैसत्यं वृत्तान्त कथन करणारे पुस्तक–




**लेखक : विजय परुळकर**

**सचित्र आवृत्ती, पंचरंगी मुखपृष्ठ, किंमत रुपये छत्तीस**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

# □ पहाडियांनंतर आता नंबर कोणाचा ?...

एकदा मुख्य मंत्री म्हणून निवड केली आहे, त्यांच्या स्थानाला शक्य तो हात लावायाचा नाही असे इंदिराजींचे सर्वसाधारण धोरण होते; पण जगन्नाथ पहाडिया यांनी राजस्थानमध्ये अशी अवस्था निर्माण केली की, त्यांची हकालपट्टी होणे अपरिहार्य होऊन गेले. २०० सदस्य असलेल्या राजस्थानच्या विधानसभेमध्ये इंदिरा कॉंग्रेसचे चांगले १३७ आमदार असूनही त्यांना राज्याला कृतिशील सरकार देता आले नाही. अनेक वेळा त्याना ताकीद देण्यात आली; परंतु त्यांनी फारसे मनावर घेतले नाही. दिल्लीत आपल्या विरुद्ध वातावरण तयार होत आहे असे लक्षात येताच आपल्याला आमदारांचा पाठिंबा मिळावा म्हणून पहाडियानी सुमारे ४० आमदारांना सरकारी खिरापतीच्या जागा उपलब्ध करून दिल्या आणि आपल्याला पाठिंबा घोषित करणारे ८५ आमदारांचे एक परिपत्रकही घोषित करविले; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही आणि त्याना जावे लागले. जवळजवळ दहा वर्षे केंद्रामध्ये मंत्री म्हणून काम करूनही पहाडियांना स्वत.साठी स्थान निर्माण करता आले नव्हते. तथापि त्याचबरोबर त्याची अकार्यक्षमता त्याच्या इंदिरानिष्ठेमागे लपली गेली. अनेक वर्षे उपमंत्री म्हणून काम केल्यावर जानेवारी ८० मध्ये त्यांना राज्यमंत्रीपद देण्यात आले आणि अगदी नजरेच्या धाकात राहाणारा मनुष्य असल्याने त्याच्याकडे राजस्थानचे मुख्यमंत्रीपद सोपवण्यात आले; परंतु पहाडियाना मंत्रिमंडळ बनवता आले नाही, धड जनतेला खूष ठेवता आले नाही की धड दिल्लीश्वराची मर्जीही साभाळता आली नाही. लोकाशी त्याची वागणूक विलक्षण उद्धटपणाची असे. एका मोठ्या उद्योगपतीनी पूर्वी दिलेल्या वेळेनुसार त्यांना भेटायचा प्रयत्न केला. त्याना चार तास ताटकळत ठेवल्यानंतर मुख्यमंत्री आज आपल्याला भेटू शकणार नाहीत, असे अत्यंत तुटक शब्दात सागण्यात आले. त्यानी पत्र लिहून हा सारा प्रकार इंदिराजीना कळवला होता. पत्रकाराबरोबरही त्याना सलोख्याचे संबंध निर्माण करता आले नाहीत. शासकीय निर्णयाच्या बाबतीत त्यांनी मागासलेल्या जमातीच्या आय्. ए. एस्. अधिकाऱ्यावर अवाजवी विश्वास टाकला. ते स्वत· या समाजामधून आले असल्याने हेच लोक आपले खरे मित्र आहेत, अशी समजुत करून घेऊन त्यानी अनेकाना बढत्या दिल्या. इतकेच नव्हे तर केंद्रोय सेवेमधील एक दुय्यम अधिकारी सी. एस्. खेरवाळ याच्या हाती स्वत:च्या कार्यालयाची सर्व सूत्रे सोपवून ते मोकळे झाले. या महोदयांना राजस्थानच्या प्रश्नांची धड कल्पनाही नव्हती. त्यानी अनेक चुकीचे निर्णय घेतले. इतकेच नव्हे तर त्यांच्या काही निर्णयामागे लाचखोरीचा प्रकार असावा असे वाटण्यासारखी परिस्थिती होती. त्यांच्याविरुद्ध अनेक तक्रारीही गेल्या; पण परिस्थितीत फरक पडला नाही !

पहाडियांच्या विरुद्ध अनेक तक्रारी दाखल झाल्यावर काही तरी हालचाल होणे जरूर होते. इंदिराजीनी राजस्थान शासनाचे मुख्य सचिव म्हणून दिल्लीमधील एक कार्यक्षम अधिकारी श्री. बाळी यांना पाठवून दिले. पहाडियांनी या गोष्टीला विरोध केला होता; पण तो विचारात घेतला गेला नाही. श्री. बाळी व पहाडिया यांचे सूत जमू शकले नाही. खेरीज, राजीव गांधी पहाडियाबाबत अतिशय असमाधानी होते. एका विशिष्ट उपमंत्र्याचा त्यानी वारंवार पाठपुरावा केला. त्याला बढती देण्यात यावी असे निरोप पोहचवले; परंतु याबाबत स्वत: राजीव गांधीनी शब्द टाकावा अशी पहाडिया यांची अपेक्षा होती; पण नेहरूंचा वारसा सांगणारी मंडळी असे करत नसतात. गोष्टी स्वत: करण्यापेक्षा त्या करवून घेण्यावर त्यांचा जास्त भर असतो; पण पहाडिया हे समजू शकले नाहीत. आता फार झाले, अशा भूमिकेतून त्यांची हकालपट्टी करण्यात आली !

पहाडिया तर गेले. आता नंबर कोणाचा? जाहीररीत्या पंतप्रधान असेच सांगत आहेत की, अन्य कोणत्याही मुख्यमंत्र्याची हकालपट्टी होणार नाही ! परंतु प्रत्यक्षात प्रत्येक मुख्यमंत्र्याच्या काम करण्याच्या पद्धतीवर त्या स्वत. लक्ष ठेवून आहेत. याच दृष्टीने अलिकडेच त्यांनी मध्य प्रदेशाचा दौरा केला होता. स्वपक्षीय मुख्यमंत्र्याना हात न लावण्याचे सर्वसाधारण धोरण असले तरी कोणत्याही मुख्यमंत्र्याला आपण पूर्ण सुरक्षित आहोत असे वाटत नाही. तशी भावना निर्माण होणार नाही याची त्या दक्षता घेतात. पंजाबचे दरबारासिंग मुख्यमंत्रीपदाबरोबरच पंजाब इंदिरा कॉंग्रेसचे पक्षाध्यक्षपदही संभाळत होते. त्यानी पक्षाध्यक्षपद सोडावे असे त्यांना वारंवार सूचित करण्यात आले परंतु त्यांनी लक्ष दिले नाही. अखेरीस जवळजवळ जाहीर खरडपट्टी काढल्यानंतर त्यांनी प्रदेशाध्यक्षाचे पद सोडून दिले. ओरिसाचे मुख्यमंत्री जे. बी पटनायक हे जाणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या यादीवर बऱ्याच वरच्या क्रमाकावर आहेत. त्यांच्या १८ सदस्य असलेल्या त्रिस्तरीय मंत्रिमंडळमधील जवळजवळ १३ जागा पटनाईक कुटुंबियांकडे आहेत. शासकीय अधिकाऱ्यांच्या संदर्भातही त्यांनी हेच प्रमाण कायम ठेवले आहे. ओरिसामधील खाणमालकांकडून शासनाला सुमारे ३॥ कोटी रुपये येणे होते. ते रद्द बातल करावे असे मुख्यमंत्र्यांनी महसूलमंत्र्यांना सुचवून पाहिले. त्या बदल्यात त्यानी राजकीय देवघेवीचा प्रकार योजलेला होता; परंतु त्यांची योजना तशीच बारगळली. ओरिसामधील ५ धनाढ्य उद्योगपतींपैकी एका कुटुंबाकडून विक्रीकराची फार मोठी रक्कम येणे होती. त्यात सूट दिली जावी अशी त्यांची इच्छा महसूलमंत्र्यांनी डावलली. अखेरीस संबंधित मंत्री श्री. के. सी. लेंका याना जावे लागले. लेंका याच्या हकालपट्टीला दिल्लीची संमती असली तरी पटनाईक यांच्या बाबत समाधानाची भावना नाही. आणि कदाचित त्यानाही पहाडियाच्या वाटेने जावे लागेल. उ. प्र. च्या वि. प्र. सिंग यांना केंद्राचा पूर्ण पाठिंबा असला तरी तेथील असमाधानी गटाने उ. प्र. चे मुख्यमंत्रीपद नेहरू कुटुंबियांकडे असावे अशी मागणी करून राजीव गांधी, अरुण नेहरू, आणि सौ. शैला कौल अशी तीन नावेही सुचवली; परंतु उपयोग झाला नाही. सध्या तरी सिंग यांना केंद्र शासनाचा पूर्ण पाठिंबा आहे. कर्नाटकचे गुंडुराव, ओरिसाचे पटनायक आणि गुजरातचे माधवसिंग सोळंकी यांच्या बाबतीत मात्र

असे म्हणता येणार नाही. केंद्रीय गृहमंत्री योगेंद्र मकवाना आपल्या ताकदीप्रमाणे सोळंखीना त्रास देत असतात. माधवसिंग यांच्याकडे इंदिरा कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद आहे. पण ते त्यांना फार काळ स्वत:कडे ठेवता येणार नाही. दरबारासिंग यांच्या बाबतीत जे घडले त्यावरून ते योग्य बोध घेतील अशी अपेक्षा आहे. एक गोष्ट नक्की की, मुख्यमंत्र्यांच्या स्थानाला सहजी हात लावण्यास इंदिराजी राजी नाहीत. कारण त्यामुळे लागण लागल्याप्रमाणे इतर राज्यांमध्ये मुख्यमंत्री विरोधी गट मुसंडी मारू पाहतो. त्यामुळे शक्यतो बदल नको, हेच या बाबतचे सूत्र असले तरी हा काही नियम नव्हे. आणि एकदा मुख्यमंत्री झाले की पाच वर्षे निर्वेध, असे जे पूर्वी चालायचे तसे आता नाही, हे पहाडियांच्या हकालपट्टीने दाखवून दिले आहे.

## □ दारांतील गणपतींबाबत करायचे काय ?

पुण्यामधील गणेश–विसर्जन-मिरवणुकीमध्ये प्रवेश मिळावा म्हणून रांगेत गणपती उभे असतात. इंदिरा कॉंग्रेसच्या दाराबाहेरही गणपतीची भली मोठी रांग सध्या खडी आहे. मानाचा गणपती म्हणून ज्याची वर्णी लागेल असे वाटले होते त्या गणरायाची अवस्था तर विलक्षण केविलवाणी झाली आहे. मिरवणुकीचं सूत्रसंचालन करणारे सांगत आहेत की, आमच्या परीने आम्ही खूप प्रयत्नात आहोत; पण मुहूर्त मिळत नाही. दारी तिष्ठत असलेल्या गणरायाला बसल्या जागी घाम फुटला आहे. कुंपणावरील मौज अनुभवणाऱ्या आमच्या मंगलमूर्तीला कुंपणाचे काटेही बोचू पहात आहेत; पण अजून गणपती जागचा काही हलत नाही ! मानाचा गणपती अडकवून ठेवण्यात आला असला तरी डाव्या–उजव्या अंगाने इतरांना मात्र वाट करून देण्यात येत आहे. या मानकऱ्यामध्ये अडकवून ठेवलेल्या गणरायाच्या चरणी निष्ठा वाहणारी मंडळीही आहेत. आपण तर सुटलो, अशा भावनेने ती मागे वळून आपल्या मंगलमूर्तीकडे पाहू लागली तर भाव हरवलेला गणराया आता आपल्या कामाचा नाही, हे त्यांच्या लक्षात येण्यास वेळ लागत नाही. आपल्याकडे कोणी पहात तर नाही ना, अशी आशंका मनात घेऊन, ते झटकन आपली नजर बाजूला काढून घेऊन, आता आपले व ह्याचे फारसे देणे–घेणे नाही अशा भावनेने मार्गी लागत आहेत. दारी तिष्ठत असलेले गणराया घरी जाणार हे तर खरेच; परंतु हा जो प्रतीक्षेचा काळ आहे तो लांबत राहिल्याने आमच्या या गणरायाचे हाल सुरू आहेत ! पूजा, अर्चा आणि नैवेद्य अशी परिपूर्ण अपेक्षा ठेऊन प्रस्थान ठेवणारी ही मंगलमूर्ती अडचणीच्या जागी किती वेळ तिष्ठत रहाणार, याचे उत्तर देण्यासही संबंधितांना सवड नाही. काय घाई आहे ? बघू हो! वाट मिळणारच आहे, मंगलमूर्ती हलणारच आहे! अशी उत्तरे मिळत आहेत; पण नवसाला पावणाऱ्या देवावर निष्ठा ठेवायची असा आपला सर्वसाधारण परिपाठ असल्याने स्वत.च अडचणीमध्ये आलेल्या या गणरायाचे भक्तगण या देवाचा दगड झाला अशा भावनेने त्याच्यापासून दूर जात आहेत! संयोजकांना तरी दुसरे काय अपेक्षित असावे ? या देवाचे देवत्व संपून त्याचा दगड झाला म्हणजे मग कदाचित दार उघडले जाईल. तोपर्यंत जे काय धुपारे–अंगारे उडतील ते झेलत राहण्याखेरीज रांगेत नंबर लावलेला हा गणराया दुसरे काय करू शकणार ?

## □ केरळ विद्यापीठ कुलगुरु–नेमणूक

आपल्याकडे राज्यांचे राज्यपाल हे संबंधित राज्यांमधील विद्यापीठाचे पदसिद्ध कुलपती असतात. स्वाभाविकपणे विद्यापीठाच्या कुलगुरु पदांच्या नेमणुका या त्यांच्या मान्यतेने परंतु सर्वसाधारणपणे राज्यसरकारच्या सल्ल्याने होत असतात. यामधील राज्यसरकारचा सल्ला हा जो भाग आहे तो सामान्यत: प्रथेचा भाग आहे. तथापि केरळच्या राज्यपाल श्रीमती ज्योती वेंकटाचलम यानी ही प्रथा मोडली. त्याच्याकडे केरळ विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी तीन नावाची शिफारस करण्यात आल्यावर त्यानी राज्यसरकारच्या सल्ल्याने एकाच व्यक्तीची निवड करायची असा जो सर्वसाधारण संकेत आहे तो बाजूला ठेवला आणि आपल्या मर्जीने आणि आपल्या अधिकारात त्या तीन नावातून डॉ. ए. व्ही. वर्गिस यांची निवड करून टाकली व त्याप्रमाणे रीतसर घोषणा केली. केरळमध्ये जर इंदिरा कॉंग्रेसचे शासन असते तर हा कदाचित एवढा वादाचा विषय झाला नसता !

केंद्रात इंदिरा सरकार असले तरी केरळमध्ये विरोधी पक्षाचे सरकार आहे. राज्यपाल हा केंद्राचे प्रतिनिधित्व करतो. तथापि त्याला काम मात्र राज्य सरकारबरोबर करायचे असते. स्वाभाविकपणे राज्यामध्ये जर विरोधी पक्षाचे सरकार असेल तर राज्यपालाच्या प्रत्येक निर्णयाकडे एका वेगळयाच दृष्टिकोनातून पाहिले जाते. केरळ सरकारने नेमक्या याच दृष्टिकोनातून राज्यपालाच्या निर्णयाकडे पाहिले आहे. केरळ विधानसभेमध्ये हा विषय निघाला त्या वेळी राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी राज्यपालाच्या निर्णयाबाबतची आपली नापसंती बोलून दाखवली. त्यातून श्री. ए. व्ही. वर्गिस हे अनेक वर्षे अमेरिकेमध्ये होते आणि काही वर्षांसाठी ते भारतामध्ये आले असताना त्याच्याकडे केरळ विद्यापीठाचे कुलगुरुपद सोपवले जावे ही गोष्ट राज्यसरकारला रुचणारी नाही. आता राज्यपालाना याची जाणीव नसेल असे नाही; परंतु त्यांनी निर्णय देऊन टाकला. त्यांच्या या निर्णयामुळे संकेत मोडले गेले असले तरी ही फार गंभीर बाब आहे असे मानता येणार नाही. विशेषत: त्यानी ज्या परिस्थितीमध्ये हा निर्णय घेतला त्या परिस्थितीचा विचार करता त्यानी आपल्या पदाला साजेसा निर्णय दिला असे मानावे लागेल. आता तीन नावांपैकी कोणत्या नावाची निवड करायची याची जबाबदारी केरळ विद्यापीठाचे कुलपती या नात्याने त्यांच्यावर येऊन पडल्यावर त्यांनी कोणत्याही एका नावाची निवड केली असती तरी वाद निर्माण झाला असता. या नेमणुकीच्या वेळी त्यानी राज्यसरकारचा सल्ला घ्यावा हा जसा संकेत आहे, त्याचप्रमाणे त्यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाचे मत विचारात घ्यावे असाही संकेत आहे. राज्यसरकारला मान्य असणारे नाव विद्यापीठ अनुदानमंडळाने नाकारले आणि विद्यापीठ ही स्वायत्त संस्था असली तरी विद्यापीठ अनुदानमंडळाशी या

संस्थेचा नित्याचा संबंध आहे. त्यामुळे राज्यशासनाचे आणि विद्यापीठ अनुदान मंडळाचे कुलगुरूच्या नावाबाबत मतभेद झाल्यावर राज्यपालांनी अनुदान मंडळाने पुरस्कार केलेल्या नावाबाबत अनुकूलता दाखवली तर त्याने आपल्या अधिकारकक्षेचा अधिक्षेप केला असे काही म्हणता येणार नाही. स्वतःच्या तारतम्यबुद्धीचा वापर करून राज्यपालानी योग्य तो निर्णय घेऊन एका रेंगाळलेल्या प्रश्नाचा निकाल लावला असेच म्हणावे लागेल. त्यातून कुलपती या नात्याने ज्योती वेंकटाचलम यांनी समोर आलेल्या तीन नावांतून एका नावाची निवड करायची असे म्हटल्यावर त्यांच्या स्वतःच्या मताचा विचार होणे ही अगदी स्वाभाविक बाब आहे.

शिक्षणक्षेत्रामधील या प्रश्नाचा केरळ शासनाने अकारण गाजावाजा केला. राज्यपालांच्या निर्णयाबाबतची नाराजी त्यांनी राज्यपालांकडे व्यक्त करून हे प्रकरण निकाली काढले असते तर ते जास्त सयुक्तिक झाले असते; पण या साऱ्या प्रकरणाची जाहीर वाच्यता झाल्याने ज्यांना कुलगुरु या नात्याने केरळ विद्यापीठाचे कामकाज चालवायचे आहे त्या श्री. वर्गिस यांची अवस्था काहीशी अवघडल्यासारखी झाली आहे. वर्गिस यांच्या राजकीय विचारसरणीबद्दल मतभेद असले तरी शिक्षणक्षेत्रामध्ये त्यांना मानणारी मंडळी खूप आहेत. त्यांच्यासारखा कर्तृत्ववान मनुष्य विद्यापीठाला कुलगुरु म्हणून उपलब्ध होत असताना या साऱ्या अप्रिय गोष्टींची जाहीर वाच्यता व्हावी ही गोष्ट केरळ विद्यापीठाशी संबंधित असणाराना पटलेली नाही व नाराजी व्यक्त करणारे पत्रकही त्यांनी काढले. आज विद्यापीठांमधील वातावरण फारसे चांगले नाही. कुलगुरुपद संभाळण्याची योग्यता असणारी माणसे या पदाचा स्वीकार करण्यास फारशी उत्सुक नसतात. बनारस हिंदु विद्यापीठ व अलिगढ मुस्लिम विद्यापीठ या विद्यापीठासाठी तर कुलगुरु अक्षरशः मोठ्या मुष्किलीने मिळवावे लागतात. या विद्यापीठापेक्षा केरळची परिस्थिती बरी असली तरी केरळ विद्यापीठामधी वातावरणही अशांतच आहे. अशा परिस्थिती नव्याने येणाऱ्या कुलगुरूच्या नेमणुकीवरून वाद करत बसणे राज्यसरकारला शोभा देणारे नाही. अर्थात या नेमणुकीच्या संदर्भात राज्यपालानी घेतलेला निर्णय हा अपवादात्मक परिस्थितीमधील समजला पाहिजे आणि सर्वसाधारणपणे राज्यसरकारचा विचार लक्षात घेऊनच या पदाच्या नेमणुका होणे जरूर आहे हे नमूद केले पाहिजे. कारण शिक्षण हा राज्याच्या अखत्यारीतील विषय असल्याने राज्यशासन व विद्यापीठ याच्यामधील संबंध सलोख्याचे असणेच अखेरीस हितावह आहे.

## कारागिरांचा भिकारडा सन्मान

हातकौशल्यामधील विशेष कामगिरीबद्दल काही कारागिराचा अलीकडेच दिल्लीमध्ये सत्कार करण्यात आला. हा सत्कार हा तसा वार्षिक उपचाराचा भाग असतो. उत्तम कामगिरीबद्दल ज्याचा सत्कार करण्यात येतो अशा व्यक्तीना आज-कालच्या जमान्यात दोनशे रुपयांचे पारितोषिक देणे हा एक क्रूर विनोद आहे. पहिले


# एल. पी. जी. स्टोव्ह (शेगडी)

## अत्याधुनिक सुधारणा

बाजारात विविध प्रकारच्या गॅसच्या शेगड्या हल्ली मिळतात, परतु ग्राहकाना शेगडी निवडताना तिची सुरक्षितता व गुणवत्ता यांची जरुरी असते.

प्लॅनेट ही उपयुक्तता व सुरक्षितता लक्षात घेऊन अंतरराष्ट्रीय सुधारणा, तसेच अत्याधुनिक तंत्र वापरून तयार केलेली मुबईची सुविख्यात अशी शेगडी आहे.

प्लॅनेट मिळविण्याकरिता ग्राहकांना बराच काळ तिष्ठत रहावे लागते असे तुम्ही विचारल, पण त्याचे उत्तर असे आहे की, आम्ही संख्येपेक्षा गुणवत्तेकडे जास्त लक्ष पुरवितो. सहाजिकच 'प्लॅनेट' ही. ISI च्या परीक्षणाला उतरली आहे व तिने सुवर्णपदकही मिळविले आहे.

प्लॅनेट मधील अत्याधुनिक सुधारणा म्हणजे आयात केलेल्या उत्तम पोलादापासून बनविलेला त्याचा बर्नर ! हा बर्नर दीर्घ काळपर्यंत उत्तम काम देतो आणि म्हणूनच प्लॅनेटच्या निर्मात्यांना पाच वर्षांची हमी देताना मुळीच अडचण वाटत नाही.

आता बाजारात मिळणाऱ्या प्लॅनेट शेगड्या विशेष तज्ञाकडून बनविल्या असल्याने उत्कृष्ट काम देतात व आपली गॅसचीही बचत करतात.

ग्राहकानी प्लॅनेटसारख्या दिसणाऱ्या बाजारात मिळणाऱ्या अनधिकृत व निकृष्ट दर्जाच्या शेगड्यांपेक्षा प्लॅनेट र. ट्रे. मार्क असलेल्या शेगडीचीच मागणी करावी.

पारितोषिक २०० रुपयांचे, दुसरे पारितोषिक शंभर रुपयांचे आणि तिसरे केवळ पन्नास रुपयांचे ! १९६२ साली या पारितोषिकांना प्रारंभ झाला आणि आता १९८१ सालीही तेवढयाच रकमा दिल्या जात आहेत यावद्दल पारितोषिक-विजेत्यांनी विलक्षण नाराजी व्यक्त केली. या समारंभामध्ये ब्रास धातूमधील दुर्गादेवीची मूर्ती बनवणाऱ्या श्री. एल्. एन्. भास्कर यांचा पहिल्या क्रमाकाने गौरव करण्यात आला. समारंभानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, 'या पारितोषिकामध्ये जर वाढ करण्यात आली नाही तर पुढील वर्षी एकही कारागीर पारितोषिक स्वीकारणार नाही.' पारितोषिक-विजेत्याला असे बोलण्याची वेळ यावी ही खेदाची बाब मानावी लागेल. शासन चित्रपटांसाठी पारितोषिके देते; पण सिनेमाला ग्लॅमर असल्याने वाढत्या महागाईबरोबर पारितोषिक रकमांतही वाढ केली गेली. सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल चित्रसृष्टीमधील ज्येष्ठ व्यक्तीला सन्मानित करून फाळके पारितोषिकाची प्रथा सुरू करण्यात आली त्या वेळी हे पारितोषिक केवळ दहा हजार रुपयांचे होते. त्यात वाढ होत होत ही रक्कम आता ४० हजारांवर गेली आहे. हस्तकौशल्य दाखवणाऱ्या कारागिराचा सन्मान करताना त्यालाही आपण सन्मानित झालो आहोत असे वाटावे इतपत तर त्याचा गौरव झाला पाहिजे की नाही ? पण तसे होत नसल्याने यंदा बहिष्काराची भाषा बोलली गेल्याबरोबर पारितोषिकांचे संयोजन करणाऱ्या दिल्ली व्यवस्थापनाने पुढील वर्षीपासून या रकमेमध्ये वाढ करण्यात येत असल्याची घोषणा केली. प्रथम पारितोषिक १००० रुपयांचे, द्वितीय पारितोषिक ५०० रुपयांचे व तृतीय पारितोषिक २०० रुपयांचे देण्यात येईल असे सांगण्यात आले.

प्रथम पारितोषिक ५ हजार रुपयांचे असावे व किमान पारितोषिक १ हजार रुपयांचे असावे अशी कारागिरांची मागणी होती. ती अवास्तव होती असे नव्हे; परंतु अशा मागण्या जशाच्या तशा क्वचितच स्वीकारल्या जातात. निदान या प्रकरणी कारागीर नाराज आहेत आणि काही तरी दखल घेणे जरूर आहे एवढी समज संबंधितांनी दाखवली हेच खूप झाले असे म्हटले पाहिजे.

पारितोषिक-विजेत्या कारागिराची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. या कारागिरांना नाजुक कलाकुसरीचे काम अगदी जीव ओतून करावे लागते; परंतु त्या कामाचे चीज होत नाही. त्यांनी तयार केलेल्या कलाकुसरीच्या कामाला मोल चांगले येते; परंतु त्याचा लाभ या कारागिरापर्यंत पोचू शकत नाही. परिणामी कारागिरांच्या घरामधील मंडळीही या व्यवसायात येत नाहीत. लोकरकामामधील असाधारण कौशल्य दाखवणारे पारितोषिक-विजेते अब्दुल रहीम यांचे वय साठ वर्षांचे आहे !

आपल्या पश्चात आपल्या घरामधील कोणीही हा व्यवसाय करणार नाही या कठोर वस्तुस्थितीबाबत त्यांना खंत वाटते. वर ज्यांचा उल्लेख केला आहे ते दुसरे एक पारितोषिक-विजेते श्री. एल. एन. भास्कर यांचे वय आज ६४ वर्षांचे आहे. कलाकुसरीच्या कामासाठी त्यांचे घराणे प्रसिद्ध आहे. पितळ व अन्य धातूवरील कोरीव काम करण्यात त्यांच्या चार पिढया खर्ची पडल्या. श्री. भास्कर यांना ४ मुलगे आहेत; परंतु त्यापैकी एकही मुलगा धातूच्या वस्तूवरील कोरीव कामाचा पिढीजात धंदा पुढे चालवत नाही. या व्यवसायात कष्टाच्या मानाने मोल नाही, असे त्यांचे मत आहे आणि म्हणून त्यांनी अधिक रोजगार देणारा इतर व्यवसाय निवडला आहे.

'काटेकोरपणे व्यवहार बघणाऱ्या या मुलांना दोष का देऊ, असे माझ्या मनात येत असले तरी पिढीजात कौशल्य माझ्याबरोबरच लयास जाईल याची खंतही आहे,' असेही श्री. भास्कर बोलून दाखवतात. श्री. भास्कर मूळचे मुर्शिदाबाद येथील असून त्यांनी या पारितोषिकांमध्ये पूर्वी दोन वेळा सन्मान संपादन केला आहे.

हस्तकौशल्याच्या कामाबाबत येणाऱ्या अडचणी कोणत्या, असे त्यांना विचारले असता ते म्हणतात— आम्हाला लागणाऱ्या वस्तू (कच्चा माल) सहजी उपलब्ध होत नाही. त्यामुळे व्यक्तिगत पातळीवर व्यवसाय करणारांची चांगलीच कुचंबणा होते. अवाजवी किंमत देऊन काळ्या बाजारातून हस्तदंत किंवा उत्तम संगमरवरी पत्थर घेतल्यावर स्वाभाविकपणे संबंधितांना किंमतीमध्ये वाढ करावी लागते. आमच्या वस्तू विकणारांना चांगला नफा मिळतो; परंतु प्रत्यक्ष ग्राहकाशी आमचा संपर्क नसल्याने नफ्यातला आमचा न्याय्य हिस्सा आमच्यापर्यंत पोचू शकत नाही. ब्रास व तांबे यांचे किमान आठ पत्रे मला महिन्याला लागतात; परंतु नियंत्रित दरामध्ये केवळ दोन उपलब्ध होऊ शकतात, अशी तक्रारही श्री. भास्कर यांनी केली. संगमरवरी दगडावरील कामाबद्दल ज्यांचा सन्मान करण्यात आला ते उपरेत्री म्हणतात— आम्हाला हवा तसा पत्थर आग्रा येथील एकमेव व्यापारी देऊ शकतो. नियंत्रित दरामध्ये काही ठराविक प्रमाणात पत्थर मिळतो; परंतु जादा पत्थर मात्र चापून पैसे देऊनच घ्यावा लागतो !

हस्तकौशल्याच्या कामाची मोठी परंपरा असून उत्तर भारतामधील अनेक लहान गावी तसेच काश्मीरमध्ये या व्यवसायावर गुजराण करणारी अनेक कुटुंबे आहेत. त्यांच्या कामाची परदेशातही चांगली कदर होते. निरनिराळया ठिकाणी भरणाऱ्या व्यापारी प्रदर्शनांतून शासन स्टॉल्स लावून हस्तकौशल्याचे उत्तम नमुने असलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री करते; परंतु ही परंपरा जोपासण्याचे सक्रीय प्रयत्न झाले नाहीत तर पन्नास वर्षांत हस्तकौशल्याची ही परंपरा लोप पावेल, असे या वृद्ध कारागिरांना वाटते □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# प्रा. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे नि मराठी भाषेचे शिवाजी

सुहास हरी जोशी

**प्रा.** डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांची काही मते कुणाला कदाचित पटत नसतीलही, तरीही डॉक्टरसाहेब मराठीतील एक प्रकाण्डपंडित, दीर्घपरिश्रमी, सखोल व्यासंगी, तर्ककर्कश कठोर बुद्धिवादी, प्रखर राष्ट्रभक्त नि लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते आहेत.

त्यांनी नुकतेच ७७ व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त अभीष्टचिंतन करावयास गेलो होतो. डोळ्याचा त्रास सोडला तर डॉक्टरसाहेबांची प्रकृती तशी चांगली आहे. आपले जुने विद्यार्थी भेटले तर त्यांना आनंदच होतो. त्यांनी आमचे उत्तम स्वागत केले. लगेच गप्पा, चर्चा, संभाषण यात मोठी रंगत भरली.

मध्येच मी विषय काढला. डॉक्टरसाहेब, सध्या मराठी भाषेचे शिवाजी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्यावर टीका करणे ही फॅशन ठरत आहे. त्यांच्याबद्दल परवा कऱ्हाडला एक वक्ते म्हणाले,

'मराठी भाषा कोणी बिघडवली असेल तर विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी...!'

'हे ऐकून मी थक्कच झालो! डॉक्टरसाहेब, त्यांच्या वाग्वैभवाबद्दल आपण काही सांगू शकाल?' मी

'हो!' डॉक्टरसाहेबांनी त्वरित प्रारंभ केला.

'१८८२ नंतरच्या वीस वर्षांत महाराष्ट्रियांच्या कर्तृत्वाला प्रत्येक क्षेत्रात बहर आलेला दिसतो. प्रत्येक क्षेत्रात नवे तेज निर्माण झाले, नवी चित्कळा रूपास आली, नव्या सौंदर्याची झगमगीत किरणे फाकू लागली असा प्रत्यय येतो. लोकमान्य टिळक, आगरकर, न. चिं. केळकर, काकासाहेब खाडिलकर, शि. म. परांजपे, महाराज सयाजीराव गायकवाड, गो. कृ. गोखले, चापेकरबंधू, राजवाडे, खरे, गो. स. सरदेसाई, पारसनीस, पागारकर, धों. के. कर्वे, किर्लोस्कर, देवल, श्री. कृ कोल्टकर, पं. पलुसकर, पं. भातखंडे, पं. बखले, भाऊराव कोल्टकर, ह. ना. आपटे, केशवसुत, शं. बा. दीक्षित, चिं. वि. वैद्य, वासुकाका जोशी, बाळकृष्णपंत जोशी, जनार्दन बाळाजी मोडक, माधवराव नामजोशी, वामन शिवराम आपटे, शंकर तुकाराम शाळिग्राम—

'वृत्तपत्र, ग्रंथ, निबंध, इतिहाससंशोधन, काव्य, कादंबरी, नाटक, लघुकथा, विनोद, चरित्र, राजकीय जागृती, समाजसुधारणा, धर्मजागृति, अर्थकारण, कला, शिक्षण आदि मानवी संस्कृतीच्या सर्व क्षेत्रात कार्य करणाऱ्या थोर पुरुषांची ही नावे आहेत. यातील काहींना अखिल भारतीय कीर्ती मिळालेली आहे—

'हे अभिनव तेज, नवनिर्मितिक्षम अशी ही चित्कळा महाराष्ट्राला कोठून प्राप्त झाली? नवजीवनरसानी दुथडी भरून वाहणारी ही जी वाग्गंगा, तिचा उगम कोठे होता? महाराष्ट्राच्या चिदाकाशात नव्या सृष्टीचे हे हुंकार कोठून आले?

'विष्णुशास्त्री चिपळूणकर नि त्यांची निबंधमाला हे या सर्व प्रश्नाचे उत्तर आहे. महाराष्ट्रवाणीचा पती म्हणून ज्यांचा पंडितांनी गौरव केला ते विष्णुशास्त्री हेच या नव्या सृष्टीचे जनक आहेत.

'वरील सर्व थोर पंडित, कवी, कलाकार, संशोधक यांच्या कार्याचे ज्यांनी विवेचन केलेले आहे त्या सर्वांनी एकमुखाने 'त्यांनी क्रांती केली, नवयुग निर्माण केले, मन्वंतर घडविले', असे उद्गार काढले आहेत आणि या क्रांतीमागची प्रेरकशक्ती म्हणजे निबंधमाला होय, असेच मत नमूद करून ठेवले आहे.

'श्रेष्ठ ग्रंथकाराची, इतिहासकाराची परंपरा ज्या मालेने निर्माण केली तिची योग्यता मराठी भाषेच्या इतिहासात अगदी अनन्यसाधारण आहे, हे मान्य केलेच पाहिजे. या तेजस्वी कालखंडाला उद्देशून म. गांधींनी म्हटले आहे— 'पुण्यातील लोकांनी जीवनाचे एक नवे अध्यात्म उत्पन्न केले आहे.'

प्रख्यात विचारवंत प्रा. गं. बा. सरदारही म्हणतात;

— डॉक्टरसाहेब आम्हाला उदाहरणांमागून उदाहरणे देऊन हा विषय पटवीत होते—

'तर काय म्हटले, प्रा. गं. बा. सरदार म्हणतात की, १८७४ साली निबंधमाला निघाली नि मराठी वाङ्मयाच्या इतिहासात एका नवीन युगाला प्रारंभ झाला. निबंधमालेतील विस्तृत, विद्वत्तापूर्ण, चित्ताकर्षक आणि प्रभावी लेखकांच्या योगाने हा मनू पालटला. महाराष्ट्रात स्वदेशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली. प्रत्येक विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. उदयोन्मुख लेखकांना नवीन दृष्टी मिळाली. त्याच्यात आत्मविश्वास उत्पन्न झाला आणि मराठी-वाङ्मयवैभव वाढीला लागले.'

डॉक्टरसाहेबांच्या मते 'स्वदेशाभिमानाची ज्योत प्रज्वलित झाली' याला महत्त्व आहे. ती प्रज्वलित झाली की सर्वच क्षेत्रात— केवळ वाङ्मयातच नव्हे— मानवी कर्तृत्व फुलारून येते. वर जी उदाहरणे दिलेली आहेत ती मानवी कर्तृत्वाच्या सर्व क्षेत्रांतली आहेत. त्याचे सर्व श्रेय त्या स्वदेशाभिमानाकडे आणि प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे तो प्रज्वलित करणाऱ्यांकडे जाते.

'डॉक्टरसाहेब. 'स्वभाषे'चे राष्ट्रजीवनात काय महत्त्व असते नि विष्णुशास्त्र्यांची त्याबाबतीतली कामगिरी कोणती?'

'उत्तम प्रश्न केलात. समाजाच्या अस्मितेचे पहिले अंग म्हणजे भाषा. स्वत्वाच्या दृष्टीने भाषेचे महत्त्व काय ते बांगला देशाने दाखवून दिले आहे. बागला देश हा मुस्लिमांचा देश. त्यांच्या धर्मग्रंथाची भाषा अरबी, त्याचे राष्ट्र म्हणजे पाकिस्तान. त्याची भाषा उर्दू होती; पण बागला-जनांना त्या भाषा परक्या वाटत होत्या. बंगाली ही त्यांची स्वभाषा. त्यांचे स्वत्व त्या भाषेत होते. त्यामुळे तिच्यावर आक्रमण होताच तेथले अवघे लोक एकजात खवळून उठले आणि पाकिस्तानापासून फुटून निघाले. आपल्या अस्मितेचे त्यांनी रक्षण केले.

'प्रत्येक समाज आपल्या भाषेचा असा अभिमान बाळगीत आलेला

आहे, हे जाणूनच विष्णुशास्त्री यानी स्वभाषाभिमान चेतविण्यापासूनच आपल्या लेखनास प्रारंभ केला.

'विष्णुशास्त्री म्हणत, भाषेची अभिवृद्धी ही देशाच्या उत्कर्षाचे एक मोठेंच साधन आहे म्हणजे अस्मितेची ही दोन अंगे–देश आणि भाषा–ही अविभाज्य आहेत. अशा या महत्त्वपूर्ण अंगाची– स्वभाषेची-इंग्रजीच्या वर्चस्वामुळे अवहेलना होत आहे हे पाहून विष्णुशास्त्री अस्वस्थ झाले आणि त्या भाषेचे वैभव महाराष्ट्रीयांच्या निदर्शनास आणून देण्याचे कार्य त्यानी आरंभिले. सर्व प्रकारचे विचार, विकार, भावना, कल्पना, नाना आंतरिक संवेदना, अभिप्राय हे व्यक्त करण्यास मराठी भाषा असमर्थ आहे, तीत तसे समर्पक, अर्थव्यंजक शब्दच नाहीत, असा एक आक्षेप, आश्चर्य म्हणजे पूर्वीचे नवशिक्षित पदवीधर घेत. (आणि आजही घेत आहेतच.) त्याला शास्त्रीबुवानी सणसणीत उत्तर दिलेले आहे!

डॉक्टरसाहेबानी ते उत्तर आम्हास सांगितले.

'जी भाषा बोलणाऱ्यांनी दिल्ली अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, ज्या भाषेत तुकाराम-रामदासांसारख्या भगवत्परायण साधूनी आपले श्रुतिवंद्य अर्थ ग्रथित केले, जिला मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादी कवींनी आपल्या रसाळ नि प्रासादिक वाणीने संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य आणि सरसता या गुणांकरिता कोणत्याही अन्य भाषेच्या तोंडाकडे पाहाण्याची खास गरज नाही अशी आमची खात्री आहे!'

'आणि शास्त्रीबुवांच्या मते भाषेच्या अभिवृद्धीचा मार्ग कोणता? तर मराठीत ग्रंथ झाल्याने आज ज्ञानाचा मार्ग ज्यास खुला नाही त्यास तो खुला होईल आणि त्यातूनच देशाचा उत्कर्ष साधेल. भाषेचा उत्कर्ष, विकास हे शास्त्रीबुवाचे अखंड सूत्र होय.'

डॉक्टरसाहेबांचा वाक्ओघ सतत चालू होता. आम्ही सुस्नात होत होतो.

तर मग डॉक्टरसाहेब, शास्त्रीबुवांच्या भाषेविषयी, शैलीविषयी, वैशिष्टयाविषयी आपले काय मत आहे?

: प्रथम दृष्टीत भरते ते शास्त्रीबोवांचे प्रचंड भाषाप्रभुत्व! लांब, प्रदीर्घ, पल्लेदार वाक्याची त्यांनी फेक सुरू केली की, वाचक स्तिमित होऊन जातो. भाषेला वाटेल तशी वाकविण्याचे सामर्थ्य लेखकाच्या ठायी आहे, याची प्रचीति येते आणि मनाला प्रफुल्लता वाटते.

भाषाप्रभुत्वाचा हा नवाच खेळ आपण पाहात आहोत असे त्या काळच्या लोकाना वाटले.

शास्त्रीबोवांचे आणखी एक पल्लेदार वाक्य डॉक्टरसाहेबांनी आम्हाला दाखविले.

'पण हल्ली चालू असणारे एकोणिसावे शतक हे तर सुधारणेच्या संबंधाने पहिल्या प्रतीचा बाणा मिरविणारे असता आणि या शतकात सद्धर्माचे पवित्र प्रेषित आकाशातली दिवटी घेऊन सारे भूमंडळ आक्रमीत असता आणि येशूच्या दयामय धर्माचा जिकडे तिकडे गजर करीत असता, कंठस्नानाचा व झोटिंगपाच्छाईचा प्रचार पहिल्यापेक्षा आता काडीभरही कमी आहे असं नाही!...'

अशा या मोत्याच्या सरांतून मधूनमधून संस्कृतवरून मराठीत अन्वर्थक अशी तयार केलेली वा घेतलेली शब्दांची रत्ने गुंफल्यामुळे भाषेची शोभा द्विगुणित झाली आहे.

अभिवृद्ध्यर्थ, कृतकृत्यता, पुनरुज्जीवन, पंडितमान्य, भाषेचे वर्णसौदर्य, बुद्धीची प्रगल्भता, उद्दाम कल्पनाशक्ती, मनोवृत्तीचे व्यापार, अनिष्टांचे मूळ, लेशमात्र, भूमंडळ, दुर्मताचे महाजाल, स्वार्थसाधू मिशनरी, अप्रयोजकपणा, तिरस्कारास्पद, जन्मसिद्ध, मुद्रणस्वातंत्र्य, वर्तमानपत्र, स्थित्यंतर, जनसमूह, भरतखण्ड, देशबंधुत्वाचे थोरले नाते... यांसारखे शब्द शास्त्रीबुवाच्या निबंधात मधूनमधून चमकत असतात. मराठी भाषेच्या अंगी अर्थव्यंजकता, वर्णसौदर्य फार कमी आहे, हा अलीकडील विद्वानांचा ग्रह मोडून काढण्यास आपले निबंध कारण व्हावे अशी त्यांची इच्छा होती... आणि ती पूर्ण झालेली आहे असाच वाचक निर्वाळा देतील!

आणखी विष्णुशास्त्रीच्या भाषेचा शोभादायक अलंकार म्हणजे संस्कृत वचने.

विचारसाम्यदर्शक वचनांनी गद्याला शोभा येते.

न्याय आणि म्हणी ही एक प्रकारची सुभाषितेच असतात. ती कवीची नसून समाजाची असतात; पण त्यामुळे ती अगदी सुबोध असतात.

तसेच अत्यंत समर्पक आणि उद्बोधक उपमा–दृष्टान्त देऊन अर्थ फुलविण्याची हातोटी विष्णुशास्त्री यांच्या ठायी विशेषत्वाने दिसते. उपमा–दृष्टान्तांप्रमाणेच पंचतंत्र, इसापनीती यांतील मजेदार प्रसंग व चुटके यांनी भावार्थ खुलविणे हाही विष्णुशास्त्री यांच्या शैलीचा एक विशेष आहे.

सुबद्ध, रेखीव, नेटकी रचना मराठीत अगदी अपूर्व होती. त्यामुळे ती पाहून वाचकाना तिची एकदम मोहिनी पडली, यात नवल नाही.

निबंधरचना मराठीतच काय, पण भारतातल्या कोणत्याही प्रादेशिक भाषेमध्ये तोपर्यंत झाली नव्हती. मराठीलाही हा संस्कार प्रथमच घडत होता. त्या दृष्टीने त्याचे महत्त्व फार आहे. मराठी गद्याचे विष्णुशास्त्री यांना जनक म्हणतात ते यासाठीच! गद्यरचनेचे सर्व शास्त्र त्याना करतलामलकवत् झाले होते. त्यामुळेच त्यांचे निबंध मराठीत अमर झाले होते.

थोडक्यात, विष्णुशास्त्री यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या स्वत्व, स्वाभिमान याविषयीचे जे विचार, त्याना जसे आहे तसेच त्यांच्या अद्वितीय भाषाशैलीलाही आहे हे सर्वांना मान्य होईल.

डॉक्टरसाहेब पुन्हा एकदा म्हणाले, 'ते खरोखरीच मराठी गद्याचे जनक होते!'

शेवटी डॉक्टरसाहेब म्हणाले,

'इंग्रज भारताचे कल्याण करणार, अशी जी त्या काळी मोठमोठ्या सुशिक्षितांचीही कल्पना असे, त्यांचे राज्य दैवी कृपेने येथे आले असे जे उद्गार काढले जात त्यांची विष्णुशास्त्रींना भयंकर चीड असे.'

अशा प्रलापांचा समाचार घेताना शास्त्रीबुवा म्हणत–'मराठेशाहीची टोलेजंग इमारत उभारून दिली तेव्हा शिवाजीमहाराजांनी इंग्रजांकडून शिपाईगिरी किंवा मुत्सद्देगिरी चार हजार कोसावरून उसनी मागून आणली होती काय? बाळाजीपंत पेशव्याने दिल्लीअटकेपर्यंत नजर पोचवून अवघ्या बादशाहीस आपल्या जाळ्यात गुदरविले तेव्हा आपली बुद्धी एखाद्या आंग्लभौम विद्यालयात पाजळून घेतली होती काय?...'

अतिशय तृप्त होऊन आम्ही डॉक्टरसाहेबाचा निरोप घेतला. □

श्यामचा संसार (कथा सतरावी)

फिरोझ रानडे

# श्याम फिरोझ रानडेला भेटतो त्याची कथा

'अग, राधा लवकर बाहेर ये, आज काय गंमत झाली बघ !' संध्याकाळचा कचेरीतून आल्या-आल्या श्याम ओरडतच घरात शिरला व खुर्चीवर बसून बूट काढू लागला.

बाकी इतर वेळी त्याने प्रथम हज्जार वेळा सांगूनही बाहेरचे दार उघडे टाकल्याबद्दल राधाची कानउघाडणी केली असती. दिवस कोण वाईट आलेत. दिवसा ढवळ्या खून होताहेत–चोऱ्या होताहेत वगैरे वगैरे.

अर्थात राधानेही ते सगळं काही मुकाट्याने ऐकून घेतले असते असे नाही. राजकीय पुढारी योजना बारगळल्या, दिरंगावल्या वा अगदी ठप्प झाल्या म्हणजे जसं सर्व जबाबदारी नोकरशाहीवर टाकून मोकळे होतात त्याप्रमाणे राधा पुढील दार उघडे रहाण्याची सर्व जबाबदारी मुलावर टाकून मोकळी झाली असती. एवढेच नव्हे तर मुलं अशी बेजबाबदार वागतात त्याची जबाबदारी पण श्यामवर टाकून जास्तच मोकळी झाली असती !

पण आज श्याम खास आनंदात होता. त्यामुळे घराचे दार उघडेच होते वगैरे गोष्टीकड त्याने काना–डोळा केला. त्याला राधाला केव्हा एकदा गंमत सागतो ह्याची इतकी घाई झाली होती की, त्याने बुटाचे बंदसुद्धा न काढता बूट पायातून उपसून काढले व मोजे काढत परत ओरडला,'राधा, गंमत ऐक तर खरी !'

पण पुरुषांना ज्यात गंमत वाटेल त्यात बायकांना वाटेलच असे नाही व दुसरे म्हणजे श्यामच्या गमत वाटण्याचा काही भरंवसा नव्हता. अगदी रस्त्यानं बसची वा गाडीची टक्कर झाली वा पावसाने गाड्या बंद पडल्या अथवा कचेरीत कोणी मरून कचेरीला अर्धा दिवस सुट्टी मिळाली तरी त्यात श्यामला गंमत वाटत असे.

तेव्हा राधाने शातपणे चहाचे पाणी गॅसवर ठेवले, गॅस पेटवला व तो हलका करून पदराला हात पुसत ती बाहेर आली व शांतपणे विचारती झाली, 'हं, काय गंमत झाली आज ?'

'अग, आज फिरोझ रानडेची ओळख झाली !' श्याम हॉर्लिक्सच्या जाहिरातीतल्या उत्साहात म्हणाला.

'तुम्ही नका बाई अशा मुसलमान लोकांत फिरत जाऊ !' राधा काळजीमयपणे म्हणाली.

'शहाणीच आहेस, मुसलमान कोठले ? चांगले आपले जातवाले 'अे' कारांत कोकणस्थ आहेत ! ते लिहीत नाहीत का 'श्यामचा संसार–कथा ?' आणि आपल्या सगळ्या बितंबातम्या त्याना कळतात कशा म्हणून तू एकदा चिडली होतीस ? ते !'

मागे एकदा राधा 'श्यामचा संसार' कथातून येणाऱ्या त्यांच्या खाजगी गोष्टीबाबत खरंच चिडली होती; पण आता फिरोझ रानडे एकारांत कोकणस्थ आहे हे कळल्यावर तिचा राग कुठल्या कुठे पळाला!

सगळ्याना असतो-पण काही दाखवतात व काही दाखवत नाहीत. तसा राधाला आपल्या जातीचा–कोकणस्थपणाचा अभिमान होता. त्यातून दातार, पटवर्धन, बोडस वगैरे अकारांत कोकणस्थापेक्षा रानडे,गोखले, भिडे ही एकारात मंडळी खरी कोकणस्थ, असाही तिचा विश्वास होता.

पण परवा एका बाईने राधाच्या ह्या विश्वासाचा फुगा फोडला. ती म्हणाली, नुसते अेकारांत असून चालत नाही. आम्ही खरे–खुरे कोकणस्थ ! आम्ही लेले, नेने मंडळीनी तीच अक्षरे परत परत वापरून आडनावं बनवली ! आम्हीच खरे !

त्या वेळी राधाला आपले माहेरचे वा सासरचे कोणतेच नाव लेले वा नेने असू नये ह्याची खंत वाटली; पण फिरोझ रानडे हा 'आपल्या'सारखा कोकणस्थ आहे ह्याचे मनाला बरे वाटवून ती आत गेली व चहा घेऊन बाहेर आली.

'काय बाई आज-कालची नावे असतात. ब्राह्मण असतात ते मुसलमान वाटतात व मुसलमान असतात ते ब्राह्मण वाटतात !'

वाक्याचा पहिला भाग फिरोझ रानडेला उद्देशून होता, तर दुसरा भाग अंतुलेसाहेबांना होता हे वाचकांच्या लक्षात आले असेलच.

श्री. अे. आर. अन्तुले म्हणजे ह्यांचे संपूर्ण नाव आत्माराम रावजी अंतुले असणार अशी राधाची अगदी परवा परवापर्यंत समजूत होती. एवढंच नव्हे तर ते कोणते 'स्थ' असावेत ह्याचीही ती आडमार्गाने चौकशी करत असे.

पूर्वी एखादा माणूस कोणता 'स्थ' आहे हे कळण्याचा सोपा मार्ग होता. पुष्कळश्या डायऱ्या छापणारे लोक वेगवेगळ्या 'स्थ' लोकांची नुसती यादीच देत नसत तर वर गोत्र देऊन कोणाचे कोणाशी पटतं व पटत नाही ह्याचाही आराखडा देत. अर्थात हे पटणे न पटणे फक्त लग्नाच्या बाबतीत असे.

आता डायऱ्यांतून इन्कम-टॅक्स कसा भरावा, वजन-मापे व वर्षातल्या सुट्ट्या याचीच खोगीरभरती असते. त्यामुळे डायऱ्यातून 'स्थ' पणा कळण्याचा मार्ग खुटला होता.

पण साहेबांचे नाव आत्माराम रावजी असणार ह्याची परवा–परवापर्यंत म्हणजे 'सर्वधर्मसमभावा'च्या जाहिराती लागेपर्यंत राधाची खात्री होती. त्या जाहिरातीमागचे राजकारण राधाला कळले नाही तरी साहेबांचे नाव आत्माराम रावजी नाही हे मात्र कळले.

'तर ते नावाचे राहू द्या, गंमत काय झाली सागा !'

'अग, आज दुपारी मी कचेरीच्या कामाकरता ३॥–४ वाजता बाहेर पडलो होतो. कचेरीच्या कामावर असल्यामुळे घाई अशी नव्हती. तेव्हा इराण्याकडे असाच चहा घेत बसलो होतो.' चहा भुरकून पित शाम म्हणाला.

'असाच म्हणजे मोठ्याने भुरकून भुरकून का ?' राधाने चिडीने विचारले.

बायकाना नवऱ्याच्या कोणत्या गोष्टीची चीड येते ह्याची यादी केली तर ती रामदासस्वामींच्या मूर्ख लक्षणापेक्षा मोठी होईल ! त्या यादीच्या प्रथम पदी नवऱ्याचे चहा पिणे असेल. बायकोने चहा दिला व नवरा तो लगेच पिऊ लागला तरी बायकांना राग येतो ! चहा दिल्यावर नवऱ्याने तो तसाच पाच-सात मिनिटे पडू दिला तरी

बायकांना राग येतो. मग चहा भुरकून पिणाऱ्या नवऱ्याबद्दलच्या चिडीबाबत काय विचारावे ?

पण श्याम फिरोझ रानडे भेटल्यामुळे इतका आनंदात होता की राधाचा हा चिडीचा चिमटा त्याला जाणवला नाही. तो पुढे म्हणाला,

'मी असा अर्धा कप चहा पिऊन थांबलो तर समोरच्या खुर्चीवर एक दाढीवाला व एक बिगरदाढीवाला असे येऊन बसले. त्यांचे मराठी लेख, गोष्टी ह्याबद्दल बोलणे चालूच होते असे वाटते.'

कारण दाढीवाल्याने दोन चहा सांगून बिनदाढीवाल्याला विचारले, 'अच्छा, म्हणजे माझ्या श्याम-कथा बऱ्या वाटल्या तुम्हाला !' हे ऐकताच मी चपापलो. म्हटलं, अच्छा, हा दाढीवाला काय श्याम-कथा लिहिणारा ? आमच्या खाजगी गोष्टी बाहेर काढणारा ? मग मी हळहळू चहा पिऊ लागलो.

श्याम हळूहळू चहा पिऊ लागला त्यामुळे त्याचे भुरके थाबले.

'बरं, मग ?' आता राधालाही फिरोझ-कथेत इंटरेस्ट निर्माण झाला होता.

'आता बिनदाढीवाला थोडा पेचात पडला. मला वाटतं तो श्याम-कथांना चुकून बऱ्या म्हणाला होता. कारण कोणत्याही गोष्टीला चागले म्हणणे दूरच,पण बरे म्हणणेही 'बाण्या'ला सोडून होते. 'तश्या बऱ्या आहेत' बिनदाढीवाला चाचरत बोलू लागला, 'पण समाजाच्या खालच्या थराच्या जीवनाचे दर्शन त्यात होत नाही.'

'मी एवढे मोठे भारदस्त वाक्य ऐकून बाद झालो व परत एक चहा सांगितला. ''मला समजलं नाही तुम्हाला काय म्हणावयाचे आहे ते ?' फिरोझ त्या दुसऱ्या माणसाला म्हणाला. फिरोझ बहुधा त्याची फिरकी घेत असावा. 'नाही मी म्हणत होतो', परत बिनदाढीवाला चाचरत म्हणाला, 'म्हणजे दलित समाजाचे प्रश्न, त्यांची होत असलेली अवहेलना ... वगैरे.'

'पण मी कुठे म्हणतो त्याचे प्रश्न नाहीत म्हणून व त्यांच्यातले कर्तबगार लेखक कोडीबिलकर, ढसाळ, लिहिताहेतच की!'' झालच तर दया पवार !' मला आता अगदी रहावलं नाही. मी मध्येच म्हटले,

'त्या दोघानी माझेकडे लक्ष दिले नाही. फिरोझ त्या दुसऱ्या माणसाला सांगू लागला, आता ह्या पवारांचं 'बलुतं' हे उत्तम पुस्तक पहा. पण ते त्यांनीच व त्यांच्यासारख्यांनी—तसे जीवन पाहिलेल्यांनीच लिहावे. मला बलुतं म्हणजे काळं की पांढरं असतं हे माहीत नाही. पुस्तकाच्या वेष्टनावरून 'बलुतं' म्हणजे गोधडी व कांबळं असेल अशी माझी कल्पना. तेथे मी काय लिहिणार त्या जीवनावर ? कपाळ !'

'आता मला परत त्यांच्यात तोड खुपसण्याचा धीर झाला नाही, पण मी फिरोझच्या वाक्याला मनातल्या मनात दाद दिली. कारण मलाही बलुतं म्हणजे असाच पांघरूणाचा प्रकार वाटला होता.

'मी मध्यम वर्गातला मध्यम बुद्धिमत्तेचा माणूस. चिं. वि. जोशी–पुल यांच्या वृत्तीचे लिहिता आले तर बघावे म्हणून लिहितो.'

'चिं. वि. जोशी व पुलंचे नाव ऐकताच तो दुसरा माणूस झटक्यात उठला. बहुधा त्याने चि. वि. जोशींचे ऐकले नसावे व मध्ये पुलना प्रतिगामी म्हणण्याची जी लाट निघाली होती त्या लाटेत त्याने आंघोळ केली असावी !'

'तो बिनदाढीवाला गेला. फिरोझ रानडेने परत चहा मागवला. मला वाटते तोही माझ्यासारखा कचेरीच्या कामाकरता बाहेर पडला असल्यामुळे त्यालाही घाई नसावी. मग मीही परत चहा मागवला.' श्याम एवढे म्हणाला व राधाला परत चहा कर ना, म्हणून विनवू लागला.

'किती चहा पिता ?' राधा लटक्या रागाने म्हणाली. 'पण प्रथम फिरोझ-गंमत सगळी सागा. त्याला फैलावर घेतलेत की नाही ? आपल्या घरातल्या सगळ्या गोष्टी लिहितो म्हणून ?'

'तर', श्याम'तर'मधला र जितका लांबवता येईल तेव्हढा लांबवत म्हणाला, 'सोडतोय काय ?'

मी माझी प्रथम ओळख करून दिली व म्हटले की 'आमच्या घरातल्या गोष्टीबद्दल तुम्ही लिहिता हे मलाही आवडत नाही व राधालाही! आता नशीब की आमच्या शेजारी कर्वेबाई रहात नाहीत.नाही तर केव्हढा घोळ झाला असता !'

'होय ना,' राधा. 'मग काय म्हणाला तो ह्यावर ?'

'अग, प्रथम त्याला माझे नाव श्याम व तुझे राधा ऐकून आश्चर्यच वाटले. तो म्हणाला, 'तुमच्या कोणात्याही भावना दुखावल्या असतील तर माफ करा हां, मी आपला काल्पनिक श्याम व राधा योजला होता. जसे पूर्वी घरोघर मातीच्या चुली असत तसे आता घरोघर गॅस असतो. आपल्या मध्यम वर्गाचं आयुष्य साधारण सारखं असतं बघा.'

'नाही, नाही, आमच्या काही भावना दुखावल्या नाहीत. तुमच्या कथा आम्हाला आवडतात. आता त्यांची थोडीशी चटक *लागल्यासारखी* होत आहे.'

'पण आता मला पूर्वीसारखे लिहिता येणार नाही, मी काही महिन्यांकरता परदेशात जातोय.' फिरोझ म्हणाला व उठला. मी पण उठलो. पैसे दिले व बाहेर पडलो.

'तुमचीही कमाल आहे.' राधा फणकाऱ्याने म्हणाली, 'अहो, असं यावनी नाव का घेतलंत हे विचारायचे त्यांना. तीच तर खरी गंमत.'

'अग, माझे सांगणे तर संपू दे.' श्याम आता शेवटची गंमत रंगवून सांगावयाची म्हणून सांगू लागला. 'आम्ही पैसे दिले व बाहेर पडलो. मग विचारले 'पण रानडे तुमचे नाव फिरोझ कसे काय ?

'फिरोझ रानडेला ह्या प्रश्नाची सवय झाली असावी असे वाटले.

'तो म्हणाला, 'हे काही नाव नाही, हे विशेषण आहे !'

'काय नाम नाही विशेषण आहे ?' श्यामचे व्याकरण यथातथा असले तरी त्याला नाम–विशेषण वगैरेचा फरक जाणवण्याइतपत माहीत होता.

'होय, विशेषण. फिरोझ म्हणाला, हल्ली हल्ली काय झालंय की ज्याची बायको नवऱ्यापेक्षा जास्त प्रसिद्ध असते, तिच्या नवऱ्याला 'फिरोझ' असे म्हणतात. माझीही केस त्यातली.'

'कोण ह्याची एवढी प्रसिद्ध बायको ?' राधाचा इंटरेस्ट आता फिरोझमधून जाऊन त्याच्या बायकोत निर्माण झाला होता.

'काही तरी गोष्टी लिहिते. म्हणे कादंबऱ्या लिहिते, पण मुख्यतः अफगाणिस्तानच्या सध्याच्या घडामोडीवर खूप लिहिलेय म्हणे. काय नाव आहे पहा तिचं...'

'*अहो अफगाणिस्तानवर* लिहिले आहे म्हणजे ती प्रतिभा रानडे असणार !' राधा खात्रीच्या आनंदात म्हणाली.

'हा, हा, प्रतिभा रानडेच म्हणाला तो.'

□

शहीद भगवतीचरण यांचे एका नव्या पद्धतीच्या बॉबनिर्मितीच्या प्रयोगात निधन झाले. (२८ मे १९३०).

हा बाँब भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना सोडविण्यासाठी वापरात येणार होता.

भगवतीचरण यांच्या पत्नी दुर्गाभाभी.

'दुर्गाभाभी : सिंबॉल ऑफ सॅक्रिफाईस' या शीर्षकाचा एक लेख दिल्लीच्या 'लिंक' साप्ताहिकाच्या ३१ मे १९८१ अंकात आलेला होता. पंजाबचे एक आमदार रामलाल चिट्टी व सरकारी अधिकारी प्यारासिंग भोपाल या उभयतांनी हा लेख लिहिलेला होता. मराठी अनुवाद रघुपती भट्ट (पेठ वडगाव, कोल्हापूर) यांनी केलेला आहे.

# दुर्गाभाभींच्या आठवणी

दुर्गाभाभीबरोबर आमची ही दुसरी मुलाखत होती. त्याचे मोतीबिंदूचे ऑपरेशन झाले होते आणि त्या गाझियाबादच्या आपल्या मुलाच्या घरी आराम घेत होत्या. 'तुम्ही येणार हे मला माहिती होते' असं मी जेव्हा एका पंजाब सरकारच्या अधिकाऱ्याबरोबर, आत गेलो तेव्हा त्या उद्गारल्या. 'पंजाबला जायची इच्छा मी टाळू का शकत नाही, हे मला कळत नाही. पंजाबला जाण्याची आणि माझ्या सहकाऱ्यांच्या समाधिस्थानावर आदरांजली वाहण्याची एक सुप्त इच्छा माझ्यात आहे. या माझ्या दुबळ्या शरीराचे आणखी किती दिवस आहेत कोणास ठाऊक ?'

दुर्गाभाभीचे वय शहात्तरच्या पुढे आहे. 'आम्ही खिन्न दिसलो की भगतसिंग आम्हाला धमकावीत असे. 'फाशी आमच्यासाठी उत्तम मार्ग आहे !' असं तो म्हणे. आम्हाला तुरुंगात टाकलं तर बाहेर येताना आजचा माझा चेहरा आहे तसा चेहरा करून आम्ही बाहेर येत असू. तो आपल्या तत्त्वाप्रमाणे जगला आणि जेलमध्ये खितपत पडण्यापेक्षा त्याने मरण पत्करले !' हे सांगताना दुर्गाभाभीचा चेहरा उजळून आला होता.

भगवतीचरण याच्याबद्दल काही आठवणी आहेत का असं विचारल्यावर दुर्गाभाभी थोडं थबकल्या. एका दिव्याकडे बोट दाखवून त्या म्हणाल्या, 'हा दिवा म्हणजे माझी एकमेव मौल्यवान संपत्ती आहे. माझ्या पतीनी मॅट्रिकपर्यंतचा अभ्यास या दिव्याखालीच केला. कारण त्या वेळेपर्यंत आमच्या घरी वीज आली नव्हती. आजपर्यंत मी हा पितळी दिवा जपत आले आहे. आता त्याचा मुलगा 'शशी' याने ती जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांच्या मुलाने आपल्या पित्याचा फोटो असावा अशी इच्छा व्यक्त केली होती !' हे सांगताना दुर्गाभाभी सद्गदित झाल्या. शचीद्रकुमार बोहरा हे त्या वेळी खूप लहान असल्याने त्याना आपल्या पित्याविषयी अंधुक स्मृती आहेत.

पक्षाची क्रियाशील सभासद या नात्याने दुर्गाभाभी ठिकठिकाणी निरोप आणि सामान पोचवण्याचे काम करीत. सी. आय. डी. पोलिसांना चकवण्यात त्या वस्ताद होत्या. पोलिसांची गाठ आणि सी. आय. डी. बरोबरचा लपंडाव म्हणजे क्रांतिकारकांना नित्याच्या गोष्टी होत्या. 'एकमेकांची चांगली ओळख झाल्याने सी. आय. डी. चे लोक काही वेळा आम्हालाच विश्वासात घेत. तेही भारतीयच असल्यामुळे त्याच्या रिपोर्टमध्ये काय लिहायचे हेही ते आम्हालाच विचारायचे! 'दुर्गाभाभी म्हणाल्या.

त्यानंतर त्यांनी एक लक्षात ठेवण्याजोगा प्रसंग सांगितला. शची कोठे सापडेनासा झाला होता. घरातले सर्व काळजी करीत होते. काही तासानंतर एका सी. आय. डी. अधिकाऱ्याच्या खांद्यावर त्यांनी शचीला पाहिले. तो अधिकारी म्हणाला, माझ्या महान बायकोला देशासाठी मोठा त्याग केलेल्या महान पित्याच्या मुलाला बघायचे होते म्हणून मी या मुलाला घरी नेले होते ! तुमची परवानगी मिळाली नसती म्हणून मी विचारले नाही.' दुर्गाभाभी भारावून गेल्या आणि नंतर तो सी. आय. डी. चा मनुष्य क्रांतिकारकाचा सरकारमधला मनुष्य बनला !

मातृभूमीला जीवन समर्पित केलेल्या क्रांतिकारकांबरोबरचे जीवन म्हणजे एक आगळा अनुभव. दुर्गाभाभी म्हणतात : 'आम्ही पाठीमागे वळून पाहिले नाही. पश्चात्ताप नव्हता. कसलीही वाईट इच्छा नव्हती. प्रश्न नव्हते आणि वादही नव्हते. लाहोर सोडण्यापूर्वी त्यांच्या पतीनी त्यांच्याकडे ५०० रु. देताना सांगितले होते, 'याची कदाचित गरज पडेल !' काही दिवसानी सुखदेव आले आणि त्यानी ५०० रु. मागितले. स्पष्टीकरण न मागता त्यानी ते देऊन टाकले. त्यांना माहिती होते. हेतू सर्वांनाच ठाऊक होता. आणखी काही दिवसानी सुखदेव परत आले. त्यांनी मला तयारी करायला सांगितले. मी भगतसिंगाची बायको बनावे, शचीने मुलगा व अशा प्रकारे भगतसिंगाला लाहोरबाहेर काढावे असे त्यांनी मला सांगितले. त्यानी माझ्याजवळ तिकिटेही दिली. कल्पना करा ते सनातनी दिवस होते; पण आमचं जीवन समर्पित होतं. मला तावडतोब लक्षात आलं की बिछाना डोक्यावर घेऊन चालणारा आमचा नोकर म्हणजे 'राजगुरु' होता! आम्ही रेल्वेत बसलो. मी साडी नेसले होते आणि उंच टाचांच्या चपला घातल्या होत्या. भगतसिंग नखशिखान्त साहेबी पेहरावात

होता. माझ्या चेहऱ्यावर भीतीची नुसती कल्पना उमटली असती तरी आमची योजना धुळीला मिळाली असती! माझे पती जेव्हा आम्हाला कलकत्त्यात भेटले तेव्हा खरोखरीच आश्चर्यचकित झाले आणि माझ्या शौर्याबद्दल त्यांनी माझी पाठ थोपटली!'

सी. आय. डी. आणि क्रांतिकारक यांच्यातला लपंडाव अखंडितपणे चालू राहिला. भाभींनी एक प्रसंग सांगितला. सुखदेवने मोकळ्या बाँबचे शेल्स असणारी एक सूटकेस आणली होती. रेल्वेपोलिसांना चुकवून तो आमच्या घरी आला आणि रात्री झोपला. सकाळी दरवाज्यावर पोलिसांची टकटक झाली. सुशिला दिदीनं सांगितलं 'भाभी न्हाणीत आहे. ती आंघोळ करून आल्यावरच दरवाजा उघडेल. कारण घरात आम्ही दोघी बायकाच आहोत! मी सुखदेवला उठवून त्याच्या सुटकेची व्यवस्था करीत होते. पाठीमागच्या भिंतीवरून त्याने उडी मारली; पण शेल्स मात्र आमच्या कपाटातच ठेवले मग मला गडबड करून ते दडवून ठेवावे लागले. त्यानंतर मला अख्खी बादली डोक्यावर ओतून मी नुकतीच आंघोळ करून आले असा आभास करावा लागला. शोध घेऊन त्यांना काही मिळाले नाही!'

असाच प्रसंग दुर्गाभाभी 'फरारी' म्हणून जाहीर झाल्या होत्या आणि बुरख्यातून त्यांनी लाहोर सोडले तेव्हा घडला होता. अटकवॉरंट काढण्यात आले होते त्याची लाहोरमधील मालमत्ता जप्त करण्यात आली होती. काही काळानंतर त्या डेहराडूनला असल्याचा छडा सी. आय. डी. ने लावला. त्यांना हे माहिती होते की गुपीचे पोलीस पंजाब पोलिसांनी भाभीच्या घरावर धाड घालावी म्हणून वाट बघणार! गडद अंधार पडल्यावर मागच्या भिंतीवरून उडी मारून त्या हरद्वारला चालत गेल्या. पंजाब पोलिस रेल्वेत बसून डेहराडूनकडे जात असल्याचे त्यांना वाटेत पहायला मिळाले. त्याच रात्री त्यांच्या घरावर धाड पडली हे त्यांना नंतर कळले.

इतराच्या परिस्थितीचा फायदा घेऊन, त्यांना बदनाम करून स्वतः कीर्ती मिळवू पहाणाऱ्या तथाकथित स्वातंत्र्यसैनिकाबद्दल बोलताना दुर्गाभाभी उद्विग्न झाल्या. 'एक इतिहासाचा प्राध्यापक होता. पक्षाला देणगी म्हणून सुशिलादिदीने दिलेल्या सोन्याच्या बांगड्याच्या संदर्भात भगवतीचरणनी त्याला चांगलेच झापले होते. त्या प्राध्यापकाने प्रत्युत्तर म्हणून भगवतीचरणना पोलिसांचा भिडू, सी. आय. डी. एजंट वगैरे म्हणून अनेक प्रसंगी गोवण्याचा प्रयत्न केला. बऱ्याच क्रांतिकारकांना त्याने आपले म्हणणे पटवलेसुद्धा! भगवतीचरण विचारात गढलेले असल्याने फार कमी बोलत. असल्या मूर्ख आरोपांना उत्तर देणे, स्वतःचा बचाव करणे वगैरे ते कधीच करत नसत. ते म्हणत, वेळ आली की सत्य समजेलच. त्याच्या मृत्युनेच त्यांची किंमत इतरांना कळली आणि आपल्या गैरसमजाबद्दल ते पश्चात्तप्त झाले. चंद्रशेखर आझाद म्हणजे पोलादी पुरुष आणि या सगळ्यांचा नेता, पण याच्या मृत्यूने ते ढसाढसा रडले. मला जेव्हा सांगण्यात आलं की भगवतीचरणांचा मृत देह एका चादरीत बांधून तो तरंगू नये म्हणून धोंडे बांधून रावी नदीत विसर्जन करण्यापलीकडे पर्याय नाही! तेव्हा मला न दुःख झाले की कसल्या कटू भावना आल्या नाहीत, दुसऱ्या लाहोरकटाच्या खटल्यामध्ये जेव्हा आमच्यातलाच एक जण माफीचा साक्षीदार बनला आणि पाण्यातून हाडे काढून कोर्टात हजर करण्यात आली तेव्हा मात्र खूप वेदना झाल्या!' दुर्गाभाभी म्हणाल्या.

मातृभूमीच्या स्वातंत्र्यवेदीवर मोठ्यात मोठा त्याग करणे हे ज्याच्या आयुष्याचे इतिकर्तव्य होते त्या भारतमातेच्या सुपुत्राचा अंत असा झाला!

बऱ्याच काळच्या भटकंतीनंतर श्री. दुर्गादेवी बाहेर लखनौत स्थिरावल्या. तरुण पिढीच्या शिक्षणाचे कार्य त्यांनी हाती घेतले. त्यांनी सुरू केलेली मॉन्टेसरी शाळा आज २३०० विद्यार्थी शिकत असलेल्या कॉलेजमध्ये रूपांतरित झाली आहे! □

---

पुस्तके

## मार्क्सवादी समीक्षेचे सोपे विवेचन

# साहित्य आणि समाज

अविनाश सहस्रबुद्धे यांच्या 'समाज आणि साहित्य' या पुस्तिकेचे स्वागत करायला हवे. गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये मराठी साहित्य क्षेत्रात बऱ्याच घटना घडल्या आहेत. तसं म्हटलं तर साहित्याच्या क्षेत्रात दररोजच नित्य नवे काही होत असते. एखादी कविता सबंध काव्यक्षेत्राला हादरा देते; एखादा समीक्षक आपल्या समीक्षेने समीक्षेच्या जगात मंथन घडवतो; 'कोसला', 'बिढार', 'जरीला' सारख्या कादंबऱ्यांवर पुन:पुन्हा चर्चा घडत रहाते. गेल्या पाच-सहा वर्षांत साहित्य क्षेत्रात घडलेल्या घटनांचे स्वरूप वेगळे आहे. या घटनांनी साहित्यसमीक्षा, साहित्यनिर्मिती यामागच्या प्रेरणांची मुळे खणून पहायला प्रारंभ केला आहे आणि या घटनांनी, कलेसाठी कला की समाजासाठी कला, असे वाद नव्या रूपात, नवे संदर्भ घेऊन उभे केले आहेत. आणीबाणीमध्ये साहित्यकारांनी कोणत्या भूमिका घेतल्या होत्या त्याचा वेध घेतला गेलाच, चुकीच्या भूमिकांचा जाब नंतर विचारला गेलाच. साहित्यकारांच्या विशिष्ट विचारप्रदर्शनामुळे, काही सामाजिक प्रश्नांबाबतच्या उदासीनतेमुळे दोन साहित्यसंमेलने उघळली गेली. त्या काळात व त्यानंतरही साहित्य आणि समाजाच्या परस्पर संबंधाबद्दल थोड्या-फार प्रमाणात चर्चा झाली, चर्चेला तोंड फुटले, आणीबाणी व आणीबाणीनंतरच्या कालखंडात साहित्य व समाजाच्या संबंधाबद्दल प्रश्न उभे करणाऱ्या घटना घडत असल्या तरी त्याची सैद्धांतिक बाजू समजावून देणारे लिखाण जवळजवळ झाले नाहीच. याआधीच्या काळात दलित साहित्य-चळवळीला मोठा वेग आला होता. या चळवळीनेही साहित्यकारांच्या सामाजिक जाणिवाबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. प्रस्थापित साहित्याला, आविष्काराला या चळवळीने तडा दिला असला तरी प्रस्थापित साहित्यसमीक्षेला, विशेषत: विविध स्वरूपातील कलावादी समीक्षेला ही चळवळ आव्हाने देऊ शकली

नाही. या पार्श्वभूमीवर पुरोगामी चळवळीतले कार्यकर्ते, सर्वसामान्य वाचक, जिज्ञासू यांच्यासाठी साहित्य आणि समाज यामधील संबंधांची सैद्धांतिक मांडणी करणाऱ्या पुस्तिकेची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर अविनाश सहस्रबुद्धे यांची 'साहित्य आणि समाज' ही सहज, सोपी, सुगम अभ्यासपूर्ण पुस्तिका प्रकाशित झाली आहे. साहित्य, कलावंत आणि समाज यांच्या निर्मितीची व परस्पर संबंधांची मांडणी करणारी ही पुस्तिका आहे. मार्क्स व मार्क्सवादी ह्यांनी याबद्दल शास्त्रशुद्ध विचार यापूर्वी मांडले आहेत. श्री. सहस्रबुद्धे यांनी आपल्या या पुस्तिकेत मराठी साहित्यातली वेगवेगळी व वेगवेगळ्या काळातली उदाहरणे दिल्यामुळे साहित्य, समाज, कलावंत यांच्या निर्मिती व परस्पर संबंधाबद्दलचे मार्क्सवादी विवेचन समजण्यास सोपे झाले आहे.

मराठीतील साहित्यसमीक्षेवर कलावादाबरोबरच फ्रॉइडची मनोविश्लेषणपद्धती, विटगिनस्टाइन, मूर, राइल इत्यादींचाही प्रभाव आहे. काही वेळा साहित्यसमीक्षा रससिद्धांतावरही आधारित असते. हे सर्व प्रवाह साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेच्या संदर्भात कलावंत व त्याचे व्यक्तित्व यांचा विचार करतात. हा विचार बराचसा समाजनिरपेक्ष असतो; परंतु कलावंताची कलाकृती ही समाजनिरपेक्ष नसते. सामाजिक जीवनातील उत्पादनप्रक्रियेत मनुष्य अशा काही निश्चित संबंधांची स्थापना करीत असतो की, जे अपरिहार्य असतात. भौतिक जीवनातली ही उत्पादनप्रक्रिया मनुष्याच्या सामाजिक, राजनीतिक, बौद्धिक जीवनाच्या कक्षा घडवत असते. लेखकाने हा मार्क्सवादी विचार अनेक उदाहरणांनी पटवून दिला आहे.

साहित्य, कला या कुठल्याही दैवी प्रतिभेतून निघालेल्या नसून अनेक प्रकारच्या संघर्षांतून व अंतर्विरोधांमधून विकसित होणाऱ्या सामाजिक जीवनाचेच त्या मूर्त रूप असतात. मानवी जीवन, आर्थिक-सामाजिक जीवन किंवा लोकजीवनातूनच साहित्य व कलाची निर्मिती होते, हा वस्तुनिष्ठ असा भौतिकवादी दृष्टिकोन मार्क्सने कलास्वरूप शास्त्राला दिलेला आहे.

कलावादी समीक्षा कलाकृतीच्या श्रेष्ठतेचे सारे श्रेय 'प्रतिभे'ला देते. कलाकृतीचा आशय देश–कालादि मर्यादांच्या पलीकडील मानवी मनाचा असतो. प्रतिभा जन्मजात असते, साहित्याचे निकष शाश्वत असतात, असे कलावादी समीक्षक मानतात. म्हणजेच कलावंताच्या श्रेष्ठतेचे श्रेय ते 'अलौकिक' शक्तीकडे देतात; परंतु कलावंताचे व्यक्तित्व सामाजिक वास्तवाच्या अनुभूतीतून घडत असते. कलावंताचे व्यक्तित्व आणि त्याची जीवनदृष्टी हे घटक कलाकृतीच्या निर्मितीच्या केंद्रस्थानी असतात. कौटुंबिक जीवन, जातीचे जीवन, वर्गाचे जीवन, राष्ट्राचे जीवन आणि जीवनदृष्टी यामधून व्यक्तित्व घडते. जीवनातील प्रत्येक क्षेत्राला वर्गीय आधार असतात, हेही या संदर्भात लक्षात ठेवले पाहिजे.

'साहित्य आणि समाज'मध्ये मार्क्सवादाची ओळख करून देत असतानाच लेखकाने मार्क्सचा साहित्यविचार मराठी साहित्यातील उदाहरणे देऊन सांगितला आहे. तसेच या ठिकाणी कलावादी समीक्षेची आधारभूत प्रमेये समोर ठेवून मार्क्सवादी साहित्यविचार मांडल्याने कलावादी समीक्षा व मार्क्सवादी समीक्षेतील मूलभूत फरक लक्षात येणे सोपे झाले आहे. मार्क्सने फक्त आर्थिक प्रश्नांचाच विचार केला आहे, असा सर्वसामान्यांचा समज असतो; तो समज या पुस्तिकेमुळे दूर होण्यास मदत होणार आहे. मार्क्स, एंगल्स, प्लेखॉनाव, फिशर, कॉडवेल इत्यादींच्या विचार–मतप्रवाहांचे दाखले दिल्यामुळे पुस्तिकेतील प्रतिपादनास व्यापकता लाभली आहे.

लेखकाने या पुस्तिकेची नऊ भागांमध्ये विभागणी केली असली तरी ढोबळमानाने पुस्तिकेचे दोन भाग पडतात. पहिल्या भागात समाज, कलावंत व त्याची परस्परनिर्मिती, परस्परसंबंधाचा विचार केला आहे, तर दुसऱ्या भागात मराठी वाङ्मयाच्या प्रारंभकालापासून ते आजतागायत मराठी वाङ्मयाचे जाणीवदृष्ट्या विश्लेषण केले आहे. बदलत्या जाणिवांच्या संदर्भात मराठी साहित्यातील प्रवृत्तींचा मागोवा घेतला आहे. 'समाजजीवनाचा व साहित्याचा कसा कसा संबंध येतो, साहित्याच्या प्रेरणा त्या त्या काळातील समाजपरिस्थितीत कशा दडलेल्या असतात व अंतर्विरोधातून पुढे सरकणारा जीवनाचा प्रवाह साहित्यालाही कसा घडवत असतो,' हे स्पष्ट करणे हा लेखकाचा उद्देश आहे. धार्मिकता, अध्यात्मवाद, राष्ट्रवाद, सामाजिक सुधारणा, रशियन क्रांती, साम्यवाद इत्यादी विषय व घटनांचा मराठी साहित्यावरील प्रभाव सांगून कलावंताच्या प्रेरणांचा मागोवा घेतला आहे. हा भाग अतिशय माहितीपूर्ण झाला आहे. लेखकाचा मराठी साहित्याचा सखोल अभ्यास असल्याची साक्ष इथे पटते.

सर्वसाधारणपणे सैद्धांतिक, समीक्षात्मक लिखाण सर्वसामान्य वाचकाला कंटाळवाणे, जड वाटत असते; पण ही पुस्तिका सैद्धांतिक, समीक्षात्मक असूनही अतिशय रंजक झाली आहे आणि रंजक असूनही तिच्यातील 'तत्त्व', 'बोध' हरवलेला नाही हे विशेष !

— लता भिसे

समाज आणि साहित्य
अविनाश सहस्रबुद्धे.
लोकवाङ्मयगृह (प्रा.) लि. मुंबई ४.
किंमत ६ रुपये.

---

## फिनिक्स निवड

## The Pritikin Program for Diet and Exercise

By Nathan Pritikin with Patric M. Mcgradi, Jr.
(Bantam books, Pages 433, about Rs, 32 $ 3.95)

---

'द पूना कंपनी' या पुस्तकाच्या संदर्भात लिहिताना ध्वनीप्रदूषणाबद्दल जे लिहिले होते त्याबाबत थोड्या लोकांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.एक गृहस्थ म्हणाले की 'माणूस' वाचणारा ड्रायव्हर आता हॉर्नचा वापर करेल असे वाटत नाही. 'माणूस' वाचणारे असे बरेच स्कूटरस्वार असतील की जे प्रारंभापासूनच हॉर्न वाजवत नसतील. हॉर्न न वाजवणाऱ्या ड्रायव्हरने इतर हॉर्न वाजवणाऱ्या ड्रायव्हरांना त्यापासून पराङ्मुख करावे. मोटारगाड्या व दुचाकी बनविणाऱ्या कारखान्याच्या मालकांनी अगदी मृदु व कमी

डेसिबलचे हॉर्नस बनवावे. ज्यांच्या नशिबी अपघात किंवा रस्ता बेफिकिरीने वापरण्याची ज्यांना सवय असते तेथे अपघात होणारच— जास्त डेसिबलचे व कर्कश हॉर्न वापरले तरी. अलीकडे आदर्श कारखान्यांचे मालक जलप्रदूषण, वायुप्रदूषण याकडे लक्ष द्यायला लागले आहेत. केव्हा ना केव्हा तरी हॉर्नस् बनवणाऱ्यांना ध्वनिप्रदूषणाकडेही लक्ष द्यावे लागेलच. आणखीन एका सद्गृहस्थाने नाव सांगत नाही—दुसऱ्या लेखाच्या बाबतीत त्यांनी मला विचारले, 'क्लॉकवर्क ऑरेंज' हे पुस्तक व गोल्डस्पॉट याचा काय संबंध ?' मी म्हटले, 'गोल्डस्पॉटमुळे या पुस्तकाचे नाव नेहमीसाठी वाचकाच्या स्मरणात रहावे म्हणून मी तसे केले होते !'

आता प्रिटिकीनसाहेबांच्या पुस्तकाकडे वळू या. श्री. प्रिटिकीननी 'डाएट' या विषयावर ३० वर्षे अभ्यास केला आहे. कॅलिफोर्नियामधील जगप्रसिद्ध लॉंजेव्हिटी सेंटर याचे ते संचालक आहेत. तेथे ते पेशंटस्नाही ट्रीट करतात.

या पुस्तकाच्या कोणत्याही वाचकाला डाएटविषयी पत्रव्यवहार करायचा असेल तर तो खालील पत्त्यावर करावा असे ते म्हणतात—

Longetvity Center, P. O. Box 5335,
Santa Barbara, California 93108,
U. S. A.

आयर्विंग वॉलेसने त्याच्या 'बुक ऑफ प्रेडिक्शन'मध्ये असे भाकीत केले आहे की येत्या दहा वर्षांत आतड्याची क्रांती होईल. म्हणजे खाण्या-पिण्याच्या बाबतीत पुष्कळ संशोधन होईल व डॉ. प्रिटिकिन याचे म्हणणे ८०% खरे ठरेल!

प्रिटिकीनचा दृष्टिकोन थोडक्यात सांगायचा झाला तर असे म्हणावे लागेल की, कुणीही कोणत्याही 'रिफाइन्ड' वस्तु खाऊ नयेत. ( Death to Postman, Saffola Olympic ! ) रिफाइन्ड वस्तूमुळे संधिवातजन्य रोग अधिक होतात असे आढळून आले आहे. यामध्ये अथ्रॉयटीस, संधीवात, स्लीप डिस्क व इतर degenerative व्याधी मोडतात. प्रोटिनची, विशेषतः प्राणीजन्य प्रथिनाची आवश्यकता मानवी शरीराला फार कमी असते. एका आठवड्याला फक्त दीड पौंड प्राणीजन्य प्रथीन घ्यावे,असे ते सुचवतात. कोणतीही वस्तू टरफलासकट खावी असा त्यांचा फारच आग्रह असतो. निसर्गाने जशी वस्तू केली आहे त्याच्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ती खाल्ली तर शरीराला ती अधिक पोषक असते. (मंडईवाले, कोथिंबीरीची गड्डी खाली कुठेतरी ठेवू नका व निदान ती कॉर्पोरेशनच्या पाण्याने तरी धुवा !) अर्थात गॅस्ट्रो किंवा कॉलऱ्याची साथ येते त्या वेळेला फक्त शिजवलेले अन्नच खाल्लेले बरे !

या पुस्तकात श्री. प्रिटिकिन याचा आणखी एक दृष्टिकोन वाचून आश्चर्य वाटले; पण ते पटले. कंदमुळे जास्त खावीत. त्याचे कारण असे की, हवेतील प्रदूषण व औषधी फवाऱ्यामुळे होणारी हानी जमिनीत सर्वांत कमी असते. त्यांनी या बाबतीत चक्क एक आकृतीच काढली आहे. मांस, मासे, पोल्ट्री हे सर्वात अधिक प्रदूषणयुक्त असतात. त्याच्या खालोखाल डेअरीत होणाऱ्या वस्तू, खाद्यतेल, पालेभाज्या, फळे, द्विदलधान्य, इतर धान्य व शेवटी कंदमुळे ! अशा बाबतीत आकृत्या देण्याची पद्धतसुद्धा नेहमीसाठी स्मरणात रहावी म्हणून असते. या छोट्या आकृतीसाठी एक संपूर्ण पान खर्ची टाकले आहे. (श्री. कैलास संखाला यानी वाघ हा प्राणी ecological system च्या apex वर कसा आहे हे दाखवण्यासाठी अशीच एक सुंदर आकृती काढली होती. या आकृतीच्या अगदी वरचा वाघ जर निर्वंश झाला तर माणूसही खलास होईल, हा दृष्टिकोन नेहमीसाठीच लक्षात रहातो.)

दीर्घायुषी आयुष्याचा आणखी एक कट्टर शत्रू म्हणजे चरबी. चरबीच्या सेवनामुळे रक्तकणाच्या भोवती एक पातळ फिल्म तयार होते व त्यामुळे अनेक प्रकारचे नुकसान घडून येते. प्रिटिकिन तर जेवताना वर मीठ, खाद्यतेल घेऊच नये असे सांगतात. कोलेस्टेरॉलमध्येही प्रकार असतात. High Density Cholesterol (HDC) व Low Density Cholesterol (LDC) या दोहोत एक विशिष्ट प्रमाण ठेवले तर प्रकृती उत्तम राहते, असे आढळून आले आहे.

चालण्याचा व्यायाम हा अत्युत्तम आहे, असे या पुस्तकात नमूद केले आहे. या व्यायामामुळे रुधिराभिसरण उत्तम होत असते. नियमित व्यायाम या प्रकारामध्ये नियमित आणि व्यायाम हे दोन्ही शब्द तितकेच महत्त्वाचे आहेत. ज्या भाग्यवंतानी वर्षानुवर्षे नियमित व्यायाम केला आहे त्यानी जर एकच दिवस व्यायाम केला नाही तर कसे बेचैन वाटते ! व्यायामामुळे शरीरातील अनेक टॉक्सिक पदार्थ निष्प्रभ होत असतात. मानसिक तणाव पुष्कळ कमी होतो व स्नायूला एक प्रकारचे नवजीवन प्राप्त होते. कुरघोडी करण्याच्या प्रेरक शक्तीला (agressive instinct) लगाम बसतो ! (पाल्यांनो, काढा टेनिससाठी पैसे ! फायदाच होईल !)

व्हिटॅमिन्स ही शेवटी एक प्रकारची केमिकल्सच असतात. त्यामुळे नेहमी टॉनिकपेक्षा आहार व व्यायामालाच महत्त्व दिले पाहिजे. अर्थात कधी कधी एखाद्या अवघड अवस्थेतून सुटका करण्यासाठी व्हिटॅमिन्स घ्यावीच लागतात; पण गाडी रुळावर आली की व्हिटॅमिन्स बंद केलेलीच बरी !

शाकाहारी लोकांना $B_{12}$ या जीवनसत्त्वाची कमतरता असण्याची नेहमीच शक्यता असते. म्हणूनच श्री. प्रिटिकिनने आठवड्यास फक्त दीड पौंड मांसाहारी आहार सुचवला आहे.

विशेषतः, शाकाहारी लहान मुलाना, ज्यांना मांसाहार वर्ज्यच आहे त्याना अधूनमधून पूरक जीवनसत्त्वे दिलेली बरी. तेसुद्धा वजन कमी वगैरे असेल तरच !

आपल्या देशात नैसर्गिक अवस्थेतील फळे व भाज्या खाणे म्हणजे एक प्रकारची रिस्कच असते. कुठे एखादे स्वस्त फळ मिळाले व आत कीड नसेल तर आपले मन किती सुखावते ! सध्याच्या महागाईच्या ड्रॅगनच्या तोंडातील ज्वाळा आपल्या पुढ्यात असलेला घास जाळून खाक करीत आहे. असल्या परिस्थितीत चरबीने काय किंवा कशाने काय, पोटातील खळगी भरली तरी नशीब ! इकडे आहाराचे चोचले पुरवायचे अति कठीणच !

पण श्री. प्रिटिकिन म्हणतात की, गरिबांचा आहार हाच हितावह असतो. त्यात चरबी अत्यंत कमी असते, म्हणून रक्तवाहिन्या अरुंद बनून त्यांना हृदयरोग होत नाहीत. (गरिबांना सामान्यतः जे रोग होतात ते संसर्गजन्य असतात. साबण थोडासा जास्त

वापरल्याने, परिसर थोडा सुधारल्याने व सवयी थोडया बदलल्याने हे रोग सहज नाहीसे होऊ शकतील.) सुताराला रंधा मारून मारून स्पॉंडिलॉसिस किंवा स्लिप डिस्क झालेले तुम्ही ऐकले आहे का? अमूल बटर व चितळे दुधावर पोसलेल्या कांत्या दिसायला निश्चित मोहक दिसतात, पण...

एके काळी किन्सेनी सेक्स रिपोर्ट लिहिला होता. जवळजवळ त्याच्या जवळपासच डॉ. मास्टर्स व जॉन्सन यांनी सेक्सवर अनेक वर्षे संशोधन केले. या दोन्ही कामाचा जगभर गवगवा व बोलबाला झाला. आता आहाराविषयी डॉ. हर्मन टार्नोव्हर याचे 'द कंप्लीट स्कार्सडेल मेडीकल डाएट अँड स्लीम प्रोग्रॅम', डॉ. अटकिन्सचे 'सुपर एनर्जी डाएट' व 'डॉ. रुबेनचे 'सेव्ह युवर लाइफ डाएट' 'एव्हरिथिंग यू वॉन्टेड टू नो अबाउट न्यूट्रिशन' ('बट वेअर अफ्रेड टू आस्क' हे त्यांनी फक्त सेक्सच्या बाबतीतच लिहिले आहे.) अशा या पुस्तकांनी बऱ्याच देशांत खळबळ उडवून दिली आहे. आपल्या मराठीत डॉ. पानशांची आहारावरची पुस्तके लोकप्रिय झाली आहेत. ही सर्व मराठी व इंग्रजी पुस्तके 'फिनिक्स'मध्ये आहेत. आहाराच्या बाबतीत ही सर्वच मंडळी तज्ज्ञ आहेत. त्यांच्या इतक्या अनुभव व संशोधनानंतर निश्चितच त्यांना पुष्कळच उपयुक्त माहिती मिळालेली आहे. आपल्या वैयक्तिक आरोग्यासाठी त्याचा उपयोग कसा करून घ्यावा त्याबद्दल बऱ्याच क्यूज (Cues) यात मिळतील.

शेवटी एक महत्त्वाची गोष्ट विसरून चालणार नाही. स्वत:चे शरीर जरी अज्जामघले एक असले तरी ते सपशेल वेगळं असतं. फार काय, आहारातील काही ढोबळ नियमसुद्धा काही लोकांना लागू पडणार नाहीत. आहाराच्या बाबतीत One man's meat is another man's poison हे तंतोतंत खरे आहे.

इतकेच नव्हे तर वरील बहुतेक पुस्तकात परस्परविरोधी माहिती दिली आहे. म्हणूनच या आधी मी डॉ. रुबेनच्या आहारावरील एका पुस्तकाविषयी लिहिताना सांगितले होते की, अशी दोन टोकाची माहिती वाचून आपण चिडतो, कंटाळतो व आपल्या जिभेला आवडेल ते खायला लागतो! पुष्कळ वेळेला आपल्या शरीराला ज्याची गरज असते ते पदार्थ खाण्याची ओढ आपल्याला लागते हे जे 'इन्टयूशन' किंवा 'इनस्टिंक्ट' असते त्याच्याचपासून पुष्कळसे (Cues) मिळतात. पण इथे सुद्धा सारासार विचार करायला लागतो. काहींना तिखट-मीठ खाण्याचे अती डोहाळे लागतात. पण पोटाला ते मानवत नाही. असल्या वेळेला 'इंटयुशन'चे न ऐकलेले बरे.

वरील सर्व पुस्तकांत डॉ. प्रीटिकीनचा 'डाएट अँड एक्सरसाईज' हा एक असा घास आहे की जो पटकन आपल्या घशाखाली उतरतो!

—जे. एन. पोंडा

---

नाटक

## नासिरुद्दीनची रंगभूमी

नासिरुद्दीन शाह हा हिंदी चित्रपटसृष्टीतील एक आघाडीचा कलाकार. त्यातही अमिताभस्टाइल 'देमार' चित्रपटापेक्षा 'भूमिका', 'आक्रोश 'सारख्या कलात्मक, प्रायोगिक चित्रपटांमध्ये दर्जेदार भूमिका करून नासिरुद्दीननं चोखंदळ प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आणि आता तर अशा प्रकारच्या चित्रपटाशी त्याचं नाव कायमचं बांधलं गेलं आहे.

पुण्यातल्या थिएटर अ‍ॅकॅडमी या नामवंत संस्थेनं नासिरुद्दीनची 'डॉक ब्रीफ' आणि 'लेसन' या दोन एकांकिका दोन ऑगस्टला पुण्यात सादर केल्या. त्यापैकी 'डॉक–ब्रीफ' चं नासिरने दिग्दर्शन केलं होतं, तर 'लेसन' मध्ये स्वतः महत्त्वाची भूमिका केली होती.

खुनाच्या गुन्ह्यामध्ये अडकलेल्या कैद्याची धंदा न चालणाऱ्या बॅरिस्टर वकिलाशी गाठ पडते आणि त्यातून 'डॉक–ब्रीफ 'चं उपरोधपूर्ण, चमकदार संवाद असलेलं नाटय खुलत जातं. वकिलाला बऱ्याच दिवसांनी कोणी तरी अशील मिळालेला असतो. त्यामुळं त्याला खुनाच्या आरोपातून सोडवून स्वत:च्या भरभराटीची, उशीरा का होईना, मुहूर्तमेढ रोवणं हे वकिलाचं स्वप्न असतं; पण आरोपीचा निष्पापपणा, भाबडेपणा सारखा आड येत असतो. आरोपीला तो 'निर्दोष' असल्याचं पटवून देण्यातच वकीलमहाशयाचा बराच वेळ आणि श्रम खर्ची पडतात. मग कोर्टातल्या दृश्यांच्या, युक्तिवादांच्या तालमी तुरुंगातल्या त्या लहानशा खोलीतच सुरू होतात. आरोपी एखाद्या बहुरूप्याप्रमाणे कधी साक्षीदार होतो, तर कधी प्रत्यक्ष न्यायाधीश! बॅरिस्टरसाहेबांची संवादफेक सतत चालूच असते. जोडीला अधूनमधून आरोपीच वकिलाच्या फिरक्या घेत राहतो आणि त्याला सपशेल आडवा करतो!

एकांकिकेचा साचा हा असा. सारं काही घडतं ते तुरुंगातल्या एका लहानशा खोलीत. आरोपीचा भाबडेपणा आणि स्वत:ची दैन्यावस्था झटकून टाकण्यासाठी आतुर झालेल्या वकिलाचा आटापिटा हे काही वेळा करमणूक करतं; पण बऱ्याचदा कारुण्याचीच झालर लेवून येतं. जाताजाता न्यायसंस्थेला दिलेल्या उपरोधिक चपराकीही हसवतात आणि बोचतातही!

'लेसन' मध्ये स्वत: नासिर काम करणार असल्याने त्या एकांकिकेबद्दल प्रेक्षकांना जास्त उत्कंठा होती आणि म्हाताऱ्या पारशी 'टीचर'च्या भूमिकेतील नासिरने प्रेक्षकांच्या सर्व अपेक्षा पूर्ण केल्या. एका म्हाताऱ्या पारशी शिक्षकाकडे एक शालेय विद्यार्थिनी येते आणि विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त छळ केल्याशिवाय आपण देत असलेले शिक्षण

त्यांच्या धाकाखाली उतरूच शकणार नाही, या परंपरागत भूमिकेवर दृढ श्रद्धा असणारा तो 'टीचर' तिचा अतोनात शारीरिक व बौद्धिक छळ करतो, शेवटी तर 'knife' या शब्दाचे निरनिराळ्या भाषेतील उच्चार शिकवता शिकवता तो 'knife' च तिच्या पोटात खुपसला जातो !

एकांकिकेत दाखवलेला विद्यार्थिनीचा छळ आणि खून हे दोन्ही प्रकार 'फॅंटसी'च्या पातळीवरचे आहेत, हे लक्षात घेतलं की, सबंध एकांकिका सरंदिशी उलगडते. मृत-प्राय झालेल्या परंपरागत शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा कसा बळी पडतो, हे या एकां-किकेतून फार प्रभावीपणे दाखवलं आहे. नासिरचा अभिनय आणि नेहमीच्या जवार असलेल्या आवाजाच्या अगदी विरुद्ध टोकाचा आवाज यामुळेच फार मोठी जमेची बाजू. त्याचा तो पारशी 'टीचर' डोळ्यांसमोरून अक्षरश: हलत नाही. उपरोध हे याही एकांकिकेत वारंवार वापरलेलं शस्त्र आहे; पण त्याहीपेक्षा लक्षात राहातं ते हे की, आलेल्या विद्यार्थिनीचं प्रेत 'टीचर' आणि त्याची 'हाउसमेट्रन' आतमध्ये नेऊन टाक-तात तोच दारावरची बेल पुन्हा वाजते. नवी विद्यार्थिनी 'टीचर' च्या शोधात आलेली असते आणि आधीच्या विद्यार्थिनीप्रमाणेच 'हाउस मेट्रन' तिलाही शांतपणे दार उघडते.

एकांकिका इथेच संपत असली तरी या शेवटच्या प्रसंगातून सुचवलेली 'continuity' फार महत्त्वाची आहे. आमची शिक्षणपद्धती अशा तऱ्हेने आणखी किती जणांचा बळी घेणार आहे, कुणास ठाऊक, हेच यामधून सुचवायचं असावं !

भरत नाट्य मंदिरात सादर झालेल्या या दोन एकांकिकांना पुणेकर प्रेक्षकांनी चांगलीच गर्दी केली होती. यापूर्वी 'थिएटर ॲकॅडमी 'च्या वर्धापनदिनानिमित्त 'पागल-खाना ' हे दोन अंकी नाटक मुंबईच्या एका ग्रुपने सादर केलं होतं. त्यातल्या भडकपणा आणि बटबटीतपणाच्या पार्श्वभूमीवर नासिरच्या या दोन एकांकिका निश्चितच जास्त उजव्या होत्या. शिवाय हल्ली कोण-त्याही प्रायोगिक एकांकिका – नाटकांमध्ये अनिवार्य मानली जाणारी समूह 'नृत्य' आणि लेव्हल्सची भाऊगर्दी या दोन्ही एकांकिकांमध्ये कटाक्षाने टाळलेली जाण-वत होती. एकांकिकांच्या यशामध्ये याचाही मोठा वाटा आहे.

शेवटी, थिएटर ॲकॅडमीचे आभार मानले पाहिजेत. पुण्याबाहेरच्या संचाची प्रायोगिक नाटकं–एकांकिका पुणेकरांनाही पाह्यला मिळावीत, या दृष्टीने ॲकॅडमीचा हा उपक्रम निश्चितच अभिनंदनीय आहे. कारण पुण्यात 'टी. ए.'सारख्या हौशी नाट्यसंस्था आणखी चार–सहा तरी आहेत; पण षठी–षण्मासी स्वत:च एखादी एकांकिका, फारच झालं तर नाटक सादर करणं किंवा एखादी स्पर्धा भरवणं यावरच या संस्थांची हौस भागत असते. त्या पार्श्वभूमीवर 'टी. ए.'च्या या अपवादात्मक उपक्रमाचं स्वागत करायला हवं, त्याचं ऋणीही राह्यला हवं !!

—प्रतिनिधी

# चित्रपटाबाहेर....

## ☐ ताऱ्यांच्या चमचमाटा-मागील चमचे

चित्रपटाला 'विक्रीयोग्य' वस्तू म्हणून तुम्ही एकदा मान्य केलं की झालं ! मग बाजारात ही वस्तू खपवण्यासाठी किंवा मालाला उठाव आणण्यासाठी निर्माता सर्व काही क्लृप्त्यांचा उपयोग करत असतो. मग प्रचार करण्याच्या सर्व पद्धतीचा अवलंब केला जातो. जाहिरातीद्वारे अपेक्षित प्रेक्षकां-मध्ये उत्सुकता निर्माण केली जाते. फसव्या, मुलायम भाषेच्या आधारे प्रेक्षकाला मोहात पाडलं जातं. पुण्यातल्या किंवा अगदी कोण-त्याही वृत्तपत्रातल्या चित्रपटाच्या जाहिराती पाहिल्या तरी हे लक्षात येतं ! 'बोंगोच्या आकाराचा धर्मेन्द्र आणि व्हायोलिनच्या आकाराची हेमा याचा कडक रोमान्स' अशा जाहिरातीद्वारे प्रेक्षकाला चित्रपट पाहण्यास बळी पाडले जाते.

प्रत्येक चित्रपटासाठी एखादा प्रचारक या गोष्टीसाठी नेमला जातो. चित्रपटाच्या अंदाजपत्रकात प्रचारासाठी खास पैसे राखून ठेवलेले असतात; पण याव्यतिरिक्त चित्र-पटाचे तारे-तारकाही स्वत:साठी काही प्रचारकाची नेमणूक करतात आणि हे 'जन-संपर्क' अधिकारी आपल्या 'client'ला कायम प्रसिद्धीच्या झोतात ठेवण्याची खटपट करत असतात. बहुतेक वेळा त्याचे हेच काम असते. नाना लटपटी-खटपटी करून ते प्रसिद्धीच्या जवळच्या वाटा शोधतात.

मुंबईच्या फिल्मी दुनियेत चित्रपट–तारे व तारकासाठी काम करणारे सुमारे साठ-सत्तर प्रचारक हेच काम करण्यात गुंतलेले आहेत. त्यातील बनी रुबेन, हरिशकुमार मेहरा, कॉलिन पॉल, गोपाल पाडे आणि धीरेन्द्र कृष्ण ही मंडळी म्हणजे या चंदेरी ताऱ्याचे 'पाळीव' प्रचारक म्हणून प्रख्यात आहेत !

या 'पाळीव' प्रचारकांचं काम असतं, देशातील विविध भाषातून प्रसिद्ध होणाऱ्या हजारो फिल्मी मासिकातून त्यांचे फोटो प्रसिद्ध करणे, त्यांच्यावर विविध लेख छापून आणणे, पैसे भरून 'client' झालेल्या चंदेरी ताऱ्यांचे चित्रपट चालत असतील तर त्याची प्रतिमा जोपासणे आणि चित्रपट पडत असतील तर या पडत्या काळातही त्याला प्रसिद्धीत ठेवणे–विविध क्लृप्त्याचा वापर करून.

यापलीकडेही हा प्रचारक कोणता चित्र-पट स्वीकारावा, कोणता स्वीकारू नये,

कोणते कपडे घालावे इत्यादी सल्ले वेळोवेळी देत असतो. पद्मिनी कोल्हापुरेने प्रिन्स चार्लस् याचे घेतलेले 'चुंबन' ही या प्रचारकाचीच शक्कल असते, तर 'ॲन इव्हिनिंग इन पॅरिस'मधील 'बिकीनी' घातलेली शर्मिला टागोर पुन्हा त्या ड्रेसमध्ये चित्रपटात दिसत नाही ही या प्रचारकाचीच अक्कल असते. धीरेन्द्र कृष्णा या प्रचारकाने सांगितल्यामुळे शर्मिला टागोरने पुन्हा 'बिकीनी'वरील दृश्य चित्रित करण्यास संमती दिली नाही. 'त्यामुळे पॅरिसमधील दृश्य स्मरणात राहिले आहे', असे धीरेन्द्र कृष्ण म्हणतात.

कित्येक वेळा हेच प्रचारक नट नटयांनी कोणत्या भूमिका स्वीकाराव्या यावर काही बंधने लादतात. शर्मिला–राजेश ही जोडी जनमानसात स्थिरावू शकली नाही. कारण, 'आराधना' चित्रपटात शर्मिला टागोरने राजेश खन्नाच्या आईचे काम केले, असे सांगून एका प्रचारकाने राजेश खन्नाच्याच एका चित्रपटात हेमामालिनीला मिळालेली आईची भूमिका न स्वीकारण्याचा सल्ला तिला दिला आणि हेमामालिनीनेही तो मानला.

हेमामालिनीला 'स्वप्नसुन्दरी' हे विशेषण लावून प्रसिद्धीच्या झोतात आणणारे हरिशकुमार मेहरा तर मुंबईतील अनेक पत्रकारांकडून आपल्याला हवे तसे लेख लिहवून घेतात. 'शान' आणि 'क्रांति' या दोन बिग बजेट चित्रपटांच्या प्रचारकार्यासाठी मेहरांनी वीस लाख रुपये घेतल्याची वदन्ता आहे.

प्रसिद्धी मिळविण्यासाठी हे प्रचारक काही वेळा सनसनाटी बातम्या (खरं तर अफवा) मुद्दामहून छापतात. त्यामागे उद्देश असतो केवळ प्रचार! जितेन्द्र–हेमामालिनी–च्या विवाहाची बातमी एका प्रचारकानेच दोघाच्या संमतीने छापली होती. नट–नटयामधील खाजगी जीवनाबाबत आकर्षण निर्माण करण्यासाठी काही अफवा प्रसृत करून ते व्यक्तिमत्त्व वादग्रस्त करणे व त्यातून आपले प्रचाराचे उद्दीष्ट साधणे हाच बऱ्याच प्रचारकांचा धंदा असतो.

'फिल्मी गॉसीप' ला नट-नटया कितीही शिव्या घालत असल्या तरी त्यांनीच पैसे देऊन हा गॉसीपचा मसाला तयार करण्यास या प्रचारकांना भाग पाडलेले असते. या गॉसीपपलीकडेही आम्ही बऱ्याच वेळी काही गोष्टी करत असतो, असे सांगून राखी या नटीसाठी प्रचार करणारा एक प्रचारक म्हणतो की, दोन घटस्फोटानंतरही तिची प्रतिमा जपण्यात आमचा प्रचारच कारणीभूत ठरला आहे.

राजेश–डिंपल, अमिताभ–जया भादूरी यांच्या विवाहाच्या घटना असोत अथवा त्यांच्या घटस्फोटाच्या अफवा असोत, हे 'पाळीव' प्रचारक नित्य नेमाने विविध मासिकांतून भुकत असतात. प्रेक्षकाना चित्रपटगृहापर्यंत नेण्याचे व चित्रपटातील नट–नटयांच्या प्रतिमा त्यांच्या मनात रेंगाळत ठेवण्याचे काम हे 'दलाल' करत असतात. यासाठी वीस हजारापासून चाळीस लाख रुपयांपर्यंत दर आकारला जातो. प्रसिद्धीच्या हव्यासापायी नट–नटयाही हे पैसे देतात आणि प्रसिद्धीचे हे दुष्टचक्र असेच चालू राहते, चालू आहे.

## शत्रुघ्न सिन्हाचे 'लव कुश'!

शत्रुघ्न सिन्हा–चित्रपटसृष्टीतला एक तडफदार खलनायक. प्राणची 'एक्झिट' आणि अमजद खानची 'एन्ट्री' या मधल्या काळात आपल्या आवाजाची खास ढब वापरून विशिष्ट प्रकारची संवादफेक करून गाजलेला अभिनेता. सध्या शत्रुघ्न सिन्हाचा भाव कमी असला तरी परवा या नटाला वृत्तपत्रातही प्रसिद्धी मिळाली. 'शत्रुघ्न सिन्हाला जुळे' अशा मथळयाखाली बातमी आली. शत्रुघ्न सिन्हाच्या घरी दोन बालके जन्माला आली. सिन्हा घराणे स्वत:ला रामायणकालीन समजते, त्यामुळे शत्रुघ्नच्या इतर तीन भावाची नावे भरत, राम व लक्ष्मण अशी आहेत, तर शत्रुघ्नच्या बंगल्याचे नाव रामायण आहे!

या 'रामायण' परंपरेशी इमान राखून शत्रुघ्न सिन्हाने आपल्या दोन जुळया मुलांची नावे लव आणि कुश ठेवली आहेत. चित्रपटपरंपरेशी इमान राखून या दोघा मुलांनी पुढील काळात 'डबल रोल' चा घोळ घालू नये एवढीच प्रभू रामचंद्राकडे प्रार्थना करण्याचे आम्ही बाकी ठेवले आहे!

## जेव्हा दिग्दर्शकच संपावर जातात....

'हॉलीवुड' ही कपोलकल्पित चित्रपटांची निर्मिती करणारी फॅक्टरी आहे हे आता जगजाहीर आणि जगन्मान्य झाले आहे. 'फॅक्टरी' म्हटलं की, मग सर्व नियम व अटी लागू होतात त्याप्रमाणे संपाची कल्पनाही मूळ धरू लागते.

पण या महिन्यात हॉलीवुड क्षेत्रात गहजब माजला आहे. चक्क दिग्दर्शक मंडळीच संपावर गेली आहेत! गेल्या वर्षी हॉलीवुडमधील कलाकारमंडळी संपावर गेली आणि आता चित्रपटाचा सर्वेसर्वा दिग्दर्शकच संपावर गेला आहे! दिग्दर्शक समितीशी केलेल्या कराराची अंमलबजावणी न झाल्यामुळे हा संप करण्यात आल्याचे दिग्दर्शकांच्या संघटनेने म्हटले आहे.

या संपामुळे हॉलीवुडच्या चित्र-निर्मितीवर व टी. व्ही. साठी केल्या जाणाऱ्या चित्रपटाच्या निर्मितीवरही परिणाम होईल, असे येथील गॉर्डन क्रॉफर्ड या जाणकाराने म्हटले आहे.

–बिलंदर


अेक घास आअीचा...
अेक घास बाबांचा, अेक घास ताअीचा,
अेक घास भाअीचा आणि अेक घास बचतीचाही...
लहानपणापासून मुलांना बचतीची सवय लावा...
लहान-थोर सर्वांसाठी बचतीच्या अनेक योजना
आहेत आमच्याकडे.
आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.
बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा अुपक्रम)
मुख्य कचेरी : 'लोकमंगल'
शिवाजीनगर, पुणे ४११००५
व्यक्तिगत जिव्हाळा
विनय राजोपाध्ये